# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक १५ वा ❑ भारतीय सौर दिनांक २६ माघ शके १९४७, रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ८ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### शाळांमध्ये शिक्षक बनले जेफ्री एपस्टाईन?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

जेफ्री एपस्टाईनवर अल्पवयीन मुलींच्या लैंगिक तस्करी आणि लैंगिक शोषणाचे गंभीर आरोप होते. २०१९ मध्ये अटक झाल्यानंतर, त्याच्यावर फ्लोरिडा आणि न्यू यॉर्कमध्ये संघीय गुन्ह्यांचा आरोप ठेवण्यात आला. तपासानुसार, तो लैंगिक शोषणासाठी उपलब्ध असलेल्या अल्पवयीन मुलांचे एक विस्तृत नेटवर्क चालवत होता, ज्याचे अनेक प्रभावशाली व्यक्तींशी संबंध होते. शिक्षक समाजाला दिशा दाखवणारे मानले जात असले, तरी सध्याच्या काळात काही शिक्षकांच्या वर्तनात बदल होऊन ते विकृत किंवा अयोग्य बनल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. यात लैंगिक शोषण, विद्यार्थ्यांशी अयोग्य वर्तन, अभ्यासाऐवजी इतर गोष्टींवर भर देणे आणि शिक्षणाच्या पवित्र व्यवसायात चुकीच्या गोष्टींचा शिरकाव होणे या बाबींचा समावेश आहे. काही शिक्षक विद्यार्थ्यांशी अयोग्य शारीरिक किंवा लैंगिक संबंध ठेवतात, जे अत्यंत गंभीर आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर मानसिक दबाव टाकणे किंवा त्यांना अयोग्य वागणूक देणे हे प्रकार शिक्षकांकडून होत आहे आपल्या देशातील शाळांमधील काही शिक्षक देखील जेफ्री एपस्टाईन बनले आहेत.शिक्षक लहान लहान विद्यार्थिनी सोबत गैरवर्तन लैंगिक अत्याचार करत आहे अशा अनेक बातम्या दररोज वर्तमानपत्रातून वाचायला मिळत आहे.

कुटुंबियानंतर लहान मुले सगळ्यात जास्त सुरक्षित शाळेत म्हणजेच विद्येच्या मंदिरात असतात. मात्र याचं विद्येच्या मंदिरात मुलींसोबत वारंवार गैरवर्तनाच्या घटना घडत आहेत. बदलापूरमध्ये काल परवा घडलेली घटना ताजी असतानाच आता अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूरमध्ये शिक्षकी पेशाला काळिमा फासणारी घटना घडली आहे. वर्ग शिक्षकाने चार अल्पवयीन विद्यार्थिनींवर लैंगिक अत्याचार केले असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या घटनेने खळबळ उडाली असून पोलिसांनी नराधम शिक्षकाला बेड्या ठोकल्या आहेत.

श्रीरामपूर (जि. अहिल्यानगर) शहरातील एका शाळेतील शिक्षकाने आठ वर्षीय चार विद्यार्थिनींशी शाळेत लैंगिक अत्याचार केल्याचा गंभीर प्रकार घडला आहे. या शिक्षकावर बालकांवरील लैंगिक अत्याचाराच्या (पोक्सो) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल होऊन त्यास अटक झाली आहे. घटनेचा विविध स्तरातून संताप व्यक्त होत आहे. सदर शिक्षकानेवर्गातील इयत्ता दुसरीतील एका विद्यार्थिनीशी त्याने वर्ग भरलेला असताना वर्गातील मागील बाकावर बसून गैरवर्तन केले.

शिक्षकी पेशाला काळिमा फासणाऱ्या या घटनेने एकच खळबळ उडाली असून अल्पवयीन विद्यार्थिनींवर वर्ग शिक्षकाने लैंगिक अत्याचार केल्याने पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. दरम्यान पुन्हा एकदा मुलींच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे.

याच संस्थेच्या एका शाळेतील शिक्षकाच्या घरी माजी विद्यार्थिनीने आत्महत्या केल्याची घटना गेल्या आठवड्यात घडली होती. त्या प्रकरणातील शिक्षकाची केवळ बदली करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे. आता याच संस्थेच्या दुसऱ्या शाळेतील घटना समोर आली आहे.

नांदेडमध्ये एका शाळकरी विद्यार्थीनीसोबत तिच्याच शाळेतील शिक्षकाने घृणास्पद कृत्य केल्याची बातमी समोर आली आहे. प्रकरणातील पीडिता ही ७ वर्षांची असून ती नांदेड शहरातील इंग्रजी शाळेत शिकत असल्याची माहिती समोर आली आहे. संबंधित घटना बुधवारी (१९ नोव्हेंबर२०२५) घडल्याचं वृत्त आहे.

खासगी क्लास घेणाऱ्या एका ६३ वर्षीय शिक्षकाने १३ वर्षीय विद्यार्थिनीवर लैंगिक अत्याचार केला. नराधम शिक्षकाच्या या कृत्यामुळे पीडित मुलगी गर्भवती राहिली. गुजरातच्या भरूचमध्ये ही खळबळजनक घटना समोर आली आहे.

नागपुरातल्या एका शाळेत शिक्षक नववी आणि दहावीच्या काही विद्यार्थ्यांचा लैंगिक, शारीरिक छळ करत असल्याचं समोर आलंय. संबंधित शिक्षक विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्याच्या बहाण्यानं काऊन्सिलिंग रुममध्ये घेऊन गेला. मुलींना अभद्र भाषेत बोलत होता. तसेच मुलांच्या मानेवरून, छातीवरून हात फिरवत होता. मुलांना बॅड टच वाटला. त्यामुळे त्यांनी तक्रार केली. तसेच मुलांना पाण्याच्या बाटलीनं आणि डस्टरनं वर्गात मारहाण करत होता. मुलींना घाणेरड्या भाषेत बोलायचा.

शिक्षकच अत्याचार करतात असे नाही तर शिक्षिका देखील विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार करतात.ज्या शिक्षकांवर विद्यार्थ्यांच्या पालकत्वाची जबाबदारी असते, ज्ञानार्जनाची जबाबदारी असते त्या शिक्षिकेनेच शाळेतील विद्यार्थ्यांचे लैंगिक शोषण केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पुणे शहरातील मध्यवर्ती भागात असणाऱ्या एका नामांकित शाळेत हा प्रकार घडला. २७ वर्षीय शिक्षिकेने दहावीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थ्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. आणि हा संपूर्ण प्रकार शाळेतीलच स्टाफ रूम मध्ये घडला. याप्रकरणी खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या शिक्षिकेला अटक करण्यात आली आहे. शिक्षकांकडून होणारी लैंगिक गैरवर्तणूक ही मुलांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर समस्या आहे, ज्यामध्ये शारीरिक स्पर्श, अयोग्य संभाषण किंवा लैंगिक शोषण यांसारख्या बाबींचा समावेश होतो.शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर अत्याचार होऊ नये म्हणून सखी सावित्री समिती स्थापन करण्यात आली तरी देखील असे प्रकार घडत आहे.

यासाठी शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांसाठी खुला संवाद आयोजित करावा, गुड टच, बॅड टच बद्दल माहिती द्यावी,

स्पष्ट धोरणे आणि परिणाम स्थापित करावे,कर्मचाऱ्यांना हिंसाचाराबद्दल प्रशिक्षण द्यावे,हिंसाचार प्रतिबंध कार्यक्रमांची अंमलबजावणी कठोरपणे करावी, प्रतिबंध कार्यक्रमांमध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करावे. शारीरिक सुरक्षा उपायांचा वापर करावा.. सुरक्षित अहवाल यंत्रणा तयार करावे, मानसिक आरोग्य समर्थन सेवा आयोजित करण्यात यावे.

# छ. संभाजीनगर मध्ये २० ते २२ फेब्रुवारीला साहित्योत्सवचे आयोजन

## नवोदित युवा साहित्यिकांसाठी ठरणार मेजवानी

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

छ. संभाजीनगर – अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्यभारती आणि स. भु. शिक्षण संस्थेच्या वतीने येत्या २०, २१ आणि २२ फेब्रुवारी रोजी साहित्योत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या साहित्योत्सवात विविध विषयांवर चर्चासत्रे, कवीसंमेलन, नाट्यछटा सादरीकरण असे भरगच्च कार्यक्रम होणार आहेत.

या साहित्योत्सवात मराठीतील ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना ''साहित्यभारती जीवनगौरव'' पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे, अशी माहिती या उत्सवाचे स्वागताध्यक्ष मंत्री अतुल सावे यांनी शनिवारी एका पत्रपरिषदेत दिली.

या पत्र परिषदेला स. भु. शिक्षण संस्थेचे सरचिटणीस डॉ. श्रीरंग देशपांडे, प्रदेश कार्याध्यक्ष शशिकांत घासकडबी, महामंत्री प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर निमंत्रक प्रा. डॉ. सर्जे राव जिगे, कार्यवाह आर्कि. डॉ. अनिरूद्ध नाईक, कार्याध्यक्ष डॉ. विकास कापरे हे उपस्थित होते.

''जागर प्रतिभेचा युवा मनाचा'' ही थीम महोत्सवाची राहणार असून, राज्यातील युवक मोठ्या प्रमाणात महोत्सवाला उपस्थित राहणार आहेत. दि. २० (शुक्रवार) रोजी दुपारी चार वाजता ज्येष्ठ साहित्यिक बाबा भांड, प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. क्रांती चौकातील छत्रपती

शिवाजी महाराज पुतळ्यापासून सुरू होणारी ही दिंडी पैठण गेटमार्गे स. भु. परिसरात पोहचेल. या ग्रंथदिंडीत भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या विविध पथकांचा समावेश राहणार आहे. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत श्रीकांत उमरीकर लिखित ''गोदेचा हा वसा..शब्दांचा हा वारसा'' हा मराठी कविता अभंग, ओवी, स्तोत्र यावर आधारित कार्यक्रमाचे सादरीकरण होणार आहे, असे अतुल सावे यांनी सांगितले.

या साहित्योत्सवात होणारे कार्यक्रम असे :

शनिवार दि २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९.३० वाजता स. भु. परिसरात ग्रंथ प्रदर्शनी, भाषा वैभव प्रदर्शनी, गड किल्ले प्रदर्शनी, सेल्फी पॉइंट आदीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. दहा वाजता सुप्रसिद्ध लेखक आणि दिग्दर्शक अभिराम भडमकर यांच्या हस्ते साहित्योत्सवाचे उद्घाटन होईल. या वेळी स.भु. संस्थेचे अध्यक्ष ॲड. दिनेश वकील, साहित्य अकादमीचे सदस्य प्रा. नरेंद्र पाठक, सुप्रसिद्ध कवी देवीदास फुलारी, साहित्योत्सवाचे कार्याध्यक्ष डॉ. विकास कापरे, प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. बळीराम गायकवाड, प्रदेश कार्याध्यक्ष शशिकांत घासकडबी, प्रांताध्यक्ष प्राचार्य संजीव गिरासे, प्रांत कार्याध्यक्ष उमेश काळे, निमंत्रक प्रा. डॉ. सर्जेराव जिगे, कार्यवाह डॉ. आर्कि. अनिरुद्ध नाईक उपस्थित राहणार आहेत.

विविध विषयांवर चर्चासत्रे

उद्घाटन समारंभानंतर ''राष्ट्र उभारणीत सकस साहित्याचे योगदान'' या विषयावर इंद्रजित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद होणार आहे. प्रा. बळीराम गायकवाड, प्रा. प्रदीप ढवळ, आशिष मालसे त्यात सहभागी होतील. नाट्यछटा सादरीकरण आणि त्यावरील चर्चेत अभिराम भडकमकर, राजकुमार येल्लावाड, प्रा. जयंत शेवतेकर यांचा सहभाग राहणार असून, राजश्री पोहेकर, सुजाता पाठक, अवंती कुलकर्णी व पारितोषिक विजेते कलाकार सादरीकरण करणार आहेत. ''२१ व्या शतकातील स्त्री साहित्यिकांची अभिव्यक्ती'' या विषयावर मीरा निचले, माहेश्वरी गावित, प्रा. सुनिता सांगोळे, मीनल वसमतकर यांच्या उपस्थितीत परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ''महाराष्ट्राची लोकधारा'' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

✻ अभिरूप न्यायालय, कवीसंमेलन

दि. २२ रोजी सकाळी ''समाज माध्यमावरची अभिव्यक्ती'' हा परिसंवाद होणार असून, त्यात निकिता भागवत,विनोद जैतमहल, मोहिनी मोडक, प्रीतम निकम, तुषार दामगुडे आदी सहभागी होणार आहेत. ''वाचनाने आम्हाला काय दिले?'' या विषयावरील परिसंवादात प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर, समीरा गुजर, सरदार जाधव, मधुरा वेलणकर, मनोहर शिरसाठ सहभागी होतील. दुपारी ११ ते १ वाजेपर्यंत निमंत्रित आणि पारितोषिक विजेते कवींचे संमेलन होणार आहे. अभिरूप न्यायालयाचा एक कार्यक्रम होणार असून, आजची भाषा इन्स्टाग्राम, ''रिल्स आणि कविता – विरोध की संधी?'' हा त्याचा विषय आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष्यस्थानी न्या. अंबादासराव जोशी राहणार असून, शिव कदम, मुरहरी केळे, प्रा. दिलीप बिरुटे, भारत अमदापुरे यांचा त्यात सहभाग असेल. ''हातात विश्व, मनात प्रश्न : आजचे युवा साहित्य कुठे चालले आहे?'' हा परिसंवाद प्रा. रवींद्र बेंबरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून, शशिकांत घासकडबी, रेखा ढेरे, विजय लोहारे, अरुण ठोके यांचा त्यात सहभाग राहणार आहे.

प्रा. कवठेकरांचा सन्मान

समारोप सत्रात दुपारी ४.३० वाजता मराठीतील ख्यातनाम समीक्षक प्रा. डॉ. बाळकृष्ण कवठेकर यांना साहित्य भारती तर्फे ''जीवन गौरव पुरस्काराने'' सन्मानित करण्यात येणार आहे.

सन्मानपत्र, २१हजार रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. समारोपाचे भाषण प्रा. कवठेकर करणार आहेत. या कार्यक्रमाला अ. भा. साहित्य परिषदेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दिनेश प्रतापसिंह, प्रदेश संघटन मंत्री नितीन केळकर, उच्च शिक्षण विभागाच्या सहसंचालक डॉ.पंकजा वाघमारे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

# आपुलकीचा ओलावा हरवलेली फॉरवर्ड संस्कृती

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

एकेकाळी लग्नपत्रिका घरात येणं म्हणजे आनंदाची साजिरी चाहूल असायची. घरोघरी लगबग सुरू व्हायची. कुंकवाच्या बोटांनी सजलेलं, सोनसळी अक्षरांत लिहिलेलं निमंत्रण हातात आलं की नात्यातल्या ऊबदार स्पर्शाची जाणीव व्हायची. ''अहो, ऐकलंत का? फलाण्यांचं लग्न आलंय!'' हा आवाज घराघरांत घुमायचा आणि त्या एका वाक्यात कितीतरी जिव्हाळा, आपलेपणा आणि उत्सुकता सामावलेली असायची.

पण आज आज ही लग्नपत्रिका थबकली आहे आणि नात्यांमधली ऊबही हळूहळू विरत चालली आहे. कागदाचा रेशमी स्पर्श, शाईचा मंद सुवास, अक्षरांमधली मायेची ओढ सगळं काही डिजिटल प्रकाशात विरघळून गेलंय. नात्यांच्या आकाशातली एक नाजूक कळी, एक कोवळी जुळवाजुळव, जणू नि:शब्द पावलांनी दूर कुठेतरी निघून गेलीय. ताऱ्यांनी भरलेल्या आकाशातून एखादा तेजस्वी तारा निमूटपणे निखळावा, अगदी तसंच काहीसं...

आज सर्वकाही एका कोरड्या क्लिकवर येऊन ठेपलंय. लग्नाची तारीख, वेळ, स्थळ सगळं एका फॉरवर्ड मेसेजमध्ये बंदिस्त झालंय. दोन इमोजी, एक लिंक, आणि काम संपलं. पाठवणाऱ्याची सोय होते आणि घेणाऱ्याचं समाधानही; किमान

औपचारिकता तरी पूर्ण होते. पण त्या फॉरवर्डमध्ये आपलेपणाचा सुगंध कुठे असतो? आणि त्या काचेच्या स्क्रीनवर भावनांचं वजन कसं तोलणार?

पूर्वी पत्रिकेच्या कडा जशा नाजूक नक्षीने सजलेल्या असायच्या, तशीच नातीही भेटीगाठींच्या रेशीमगाठींनी घट्ट विणलेली असायची. त्या काळात निमंत्रण देणं म्हणजे एक प्रतीक असायचं ''तुम्ही आमच्यासाठी खास आहात.'' एखाद्याच्या दारात जाऊन पत्रिका देणं म्हणजे नात्यांच्या ओंजळीत आपुलकीचा ओलावा टिकवून ठेवण्यासारखं होतं. दार उघडताच होणारं हसतमुख स्वागत, चहा–पाणी, गप्पा आणि घरच्या गोष्टी हे सगळं केवळ निमंत्रण देण्यासाठी नव्हतं, तर नात्यांची वीण अधिक घट्ट करण्यासाठी होतं. त्या एका भेटीत कितीतरी गैरसमज विरघळायचे, अंतरं मिटायची आणि आठवणी नव्याने उमलायच्या. आज फॉरवर्डच्या या संस्कृतीत, दुरावा मिटवण्याची ती संधीही हरवली आहे.

मंगेश दौंडकर,
पुणे, मो.- 9890619354


पूर्वी जुन्या पत्रिकांना नुसता स्पर्श केला, तरी नाती जिवंत वाटायची. आजचा निमंत्रण संदेश दोन दिवसांत फोनमधून आपोआप गायब होतो आणि त्याच्यासोबत नात्यांमधला भावनिक ओलावाही. एखाद्या लग्नाला का जावं, कोणासाठी जावं याचं उत्तर आज उरत नाही. कारण जे निमंत्रण कधी थेट हृदयातून यायचं, ते आता फक्त मोबाईलच्या स्क्रीनवर येऊन थांबतं.

आजची पिढी वेळ वाचवते, तंत्रज्ञान वापरते हे सगळं खरं आहे. पण वेळ वाचवताना भावनांचं काय? नात्यांचं काय? एखाद्याच्या दारात पोहोचण्यासाठी लागणारी पाच मिनिटं आज महाग झाली असतील, पण मनापासून हवं असलेलं नातं टिकवण्यासाठी लागणारी मेहनत त्याहूनही अधिक दुर्मिळ झाली आहे हे आपण विसरत चाललोय.

काळ बदलतोय, जग आधुनिक होतंय... पण या आधुनिकतेच्या वाळवंटात नातीच जर रुक्ष झाली, तर? कदाचित कागदाची पत्रिका पुन्हा येणार नाही आणि ती येणं गरजेचंही नाही. पण मनातून दिलेलं निमंत्रण परत आणता येईल का? डिजिटल संदेश पाठवताना त्यात थोडंसं प्रेम मिसळता येईल का? किंवा एखाद्यासाठी दोन पावलं चालत जाऊन, दार ठोठावून, ''आम्हाला तुमची साथ हवी आहे'' हे स्वतःच्या आवाजात सांगता येईल का? कारण लग्नपत्रिका बंद झाली, याचं दुःख नाही. खरं दुःख आहे नात्यांमधली जवळीक हरवणं. आणि ही जवळीक काळाने हिरावून घेतली असली, तरी ती परत आणण्याची जबाबदारीही आपलीच आहे.

## जात्यावरच्या ओव्या.....

आडाच पाहून पाणी
देवा रूप पालटले
भेटायला नामदेवा
देव पांडुरंग आले ||५००||

न्हाणीघरापाशी
पाणी चुलीवर तापवल
बापजी गेले अंघोळीला
वैनीन उतरून दिल, ||५०१||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनाचे श्लोक – एक सार्वकालिक मनोपनिषद

ज्योतिर्मय साहित्य

(प्रिय रसिक वाचकहो, दासनवमीनिमित्त मनाच्या श्लोकांवरील लेखमाला सुरू करीत आहे. हा नवीन उपक्रम आपल्याला नक्कीच आवडेल आणि आपल्या शुभेच्छा लाभतील अशी आशा आहे. समर्थांच्या कृपेने हा संकल्प पूर्णत्वास जावो ही प्रार्थना.)

अनेक दिवसांपासून मनाच्या श्लोकांवर काहीतरी लिहावे अशी माझी इच्छा होती. परंतु समर्थांच्या प्रचितीतून आणि अनुभवातून आलेले हे दिव्य श्लोक ! त्यावर खरोखरीच मी काही लिहू शकेन किंवा तसे लिहिण्याची माझी पात्रता आहे का हाही प्रश्न माझ्या मनात होता. तो अजूनही आहे. परंतु तरीसुद्धा मला जसे सुचेल आणि आकलन होईल तसे त्यावर लेखन करावे असा कौल माझ्या मनाने मला दिला. जसे समर्थ म्हणतात कर्ता करविता राम आहे. तसेच मी सुद्धा म्हणतो की हे माझ्याकडून लिहून घेणारे समर्थ आहेत त्यांच्या कृपेनेच मी काही थोडे बहुत लिहिण्याची हिंमत करतो आहे. काही चुकले तर ते मला सांभाळून घेतील आणि आपणही सुज्ञ वाचक मला सांभाळून घ्याल.

समर्थ रामदासांनी विपुल साहित्य रचना केली आहे. त्यामध्ये दासबोध, करुणाष्टके, आत्माराम, मनाचे श्लोक, एकवीस समासी, मानपंचक, मानसपूजा अनेक देवी-देवतांची स्तोत्रे आणि आरत्या असे समृद्ध साहित्य आहे. या त्यांच्या साहित्यामध्ये प्रामुख्याने अध्यात्म विषयाचे प्रतिपादन केलेले असले तरी नानाविध विषय समर्थांनी हाताळले आहेत. त्यात प्रपंच, राजकारण, समाजकारण, व्यवस्थापन, कुटुंब नियोजन, अर्थकारण, निसर्ग आणि वनस्पती विज्ञान, संगीत यासारख्या अनेक विषयांवर साधकांना मार्गदर्शन केले आहे. या सर्व वाङ्मयातून समर्थांचा विविध विषयांचा प्रचंड व्यासंग दिसून येतो.

त्यांच्या या सर्व वाङ्मयात मनाचे श्लोक हा एक अत्यंत लघु परंतु प्रभावी असा ग्रंथ आहे. तो एक अनमोल असा हिरा आहे जो आपल्या विलक्षण तेजाने झळाळून उठतो. साधी सोपी भाषा हे त्याचे वैशिष्ट्य आहे. ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तीयोग, सदाचार, सत्संग, सगुण निर्गुण, सुखदुःख, नाम आणि ध्यान यासारख्या अनेक विषयांना समर्थांनी या छोटेखानी ग्रंथात स्पर्श केला आहे. मनाच्या श्लोकांना मनोबोध असेही म्हटले जाते. विनोबा भावेंनी तर त्याला मनोपनिषद असे सार्थ नाव दिले आहे.

मनाचे श्लोकात समर्थांनी प्रत्येक विषयाचे तर्कशुद्ध थोडक्यात विश्लेषण केले आहे. व्याकरणदृष्ट्या सुद्धा हा ग्रंथ परिपूर्ण आहे. यातील श्लोक भुजंगप्रयात या वृत्तात लिहिले गेले असून ते सुरेख असे चालीवर म्हणता येतात हे त्यांचे वैशिष्ट्य आहे. (क्रमशः)






दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# साधनप्रतिष्ठानिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

दशक ७ समास ७

नमस्कार

''हिंदवी स्वराज्याच्या जाणत्या राजाचा आज जन्मोत्सव महाप्रतापी, महाज्ञानी, जनतेचा कैवारी अशा शिवाजी महाराजांना मानाचा मुजरा करून आजच्या लेखनाला सुरवात करूया.

मित्रांनो काय योगायोग आहे पहा आपण आज शिव जयंती साजरी करत आहोत आणि आपणं अभ्यासत असलेल्या ओवीतही ''निर्विकल्पाची कल्पना समर्थ सांगत आहेत. म्हणजे ख-या अर्थाने आपण शिवाजी महाराज व समर्थांच्या विचारांच्या दिशेने जात आहोत असे मला वाटते.

प्रत्येक संतांचे सांगणे आहे की जो पर्यन्त तुम्ही अविद्येच्या छाये खाली वावरता तो पर्यन्त आपल्या मनाचे व्यापार स्मृती, लक्ष, विचार, भावना व कल्पना या आकुंचित मी पणात केंद्रित असतात. म्हणून ब्रम्हपर्यन्त जाण्यासाठी मनाची निर्विकल्पाची धारणा असणे हे परमार्थात फार महत्त्वाचे आहे.

माणसाचे मन जेव्हां ब्रम्हकेंद्रित बनते तेव्हा मन हे विद्येच्या छत्रछायेखाली वावरू लागते. ब्रम्हाशीं साक्षात स्पर्श होऊन त्याला विशालतेचे स्वरूप येते. आपण आतापर्यंत अनेक योगी महर्षी, ब्रम्हज्ञानी लोकांना पाहिले असेल किंवा वाचले असेल की त्यांच्या मनाची विशालता येवढी मोठी असते की चंचलपणाला त्याठिकाणी अजिबात थारा नसतो. आजच्या युगात ही संकल्पना मनामध्ये सतत ठेवत रहावी अशी अपेक्षा करून ऊद्याच्या ऊज्वल भारताचे स्वप्न पूर्ण पणे लोककल्याणकारी होवो ही अपेक्षा.



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

# बद्ध आणि मुक्त यांतला फरक

ज्योतिर्मय साहित्य

बद्ध हे जगाचे असतात. मुक्त हे जगाचे नसून एका भगवंताचे असतात. संताची चौकशी करताना, त्याची उपासना कोणती, गुरू कोण हे पाहतात; त्याच्या आईबापांची नाही चौकशी करीत. संतांना देहाची आठवण नसते; ते आपला देहाभिमान, मीपण, भगवंताला देतात. परमात्म्यापेक्षा विषयाची गोडी ज्याला जास्त तो बद्ध. विषयाचे प्रेम कमी होणे म्हणजे मुक्तदशेच्या मार्गाला लागणे. 'मी भगवंताचा' म्हटले की तिथे बद्धपणा संपला. आपण बद्ध आहोत हे तरी, आपणच, बद्ध आहोत अशी भावना करून घेतली आहे म्हणून. आपण, मूळ तेच रूप स्वयंसिद्ध असताना, सर्व इंद्रिये मिळून होणारा देह मी आहे असे म्हणतो; आणि त्यामुळे देहाला जे सुखदुःख होते ते आपल्याला झाले असे म्हणतो. आत्मा स्वत: त्यापासून अलिप्त असतो. परंतु आत्मा आणि देह वेगळा नाही असे आपण म्हणत असतो; म्हणून मी तोच देह आणि हा देह तोच आत्मा, अशी आपली भावना दृढ झालेली असते. परंतु आपण बोलण्यात मात्र 'माझा' हात दुखावला किंवा 'माझ्या' पोटात दुखते, असे म्हणतोच की नाही ? म्हणजे, प्रत्येक अवयव 'माझा' म्हणणारा कुणीतरी वेगळा आहे हे खरे; आपल्याला ते बरोबर समजत नाही इतकेच. मीपणा हा आपल्यात इतका बाणलेला असतो.

आपले मन विषयाच्या आनंदात रंगते, म्हणून तिथे आपण आपलेपणाने वागतो. परंतु विषयच जिथे खोटे, तिथे मन रंगूनही, ते नाहीसे झाले म्हणजे आपल्याला दुःख हे होणारच. आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिलो म्हणूनही सुखदुःख होते. म्हणून, आपण त्या सर्वांपासून निराळे आहोत असे समजून वागावे. हे होण्यासाठी परमेश्वराची भक्ती करायला पाहिजे. भक्तीला जर काही आड येत असेल तर आपली देहबुद्धीच होय; आणि ती गेल्याशिवाय खरी भक्ती होणारच नाही. तरी आपण परमेश्वराचे आहोत असे समजून वागावे. जे जे होईल ते ते त्याची इच्छा म्हणून झाले असे समजून वागू लागलो, म्हणजे आपली देहबुद्धी हळूहळू कमी होत जाईल. याकरिता काही तप, याग वगैरे करावे लागत नाही, संसार सोडून वनातहि जावे लागत नाही आणि विशेष आटाआटीही करावी लागत नाही. जे घडते ते ' मी केले ' हा मीपणा टाकून, 'मी देवाचा आहे ' असे म्हणून, आणि जे होईल त्यात आनंद मानून राहावे, म्हणजे मीपणा सुटत जाईल. हे 'मी' केले नाही, परमात्म्याच्या इच्छेने झाले, असे मानले म्हणजे मीपणा राहिला कुठे ?

ज्याप्रमाणे, मनाने मी देहाचा आहे अशी समजून झालेल्याने आपण देहरूप बनलो, त्याचप्रमाणे मनाने मी भगवंताचा आहे असे म्हणत गेल्याने आपण भगवद् रूप बनून जाऊ.

# सॅलड खा नि निरोगी रहा

ज्योतिर्मय साहित्य

सॅलड खाणे हे आरोग्यदायी जीवनशैलीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. सॅलड केवळ वजन कमी करण्यासाठीच नाही, तर शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळवून देण्यासाठीही फायदेशीर ठरते.

सॅलड का खावे?

– पोषक तत्वांचा खजिना : कच्च्या भाज्या आणि फळांमधून जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटी-ऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात मिळतात.

– पचनशक्ती सुधारते : सॅलड मध्ये फायबर (तंतुमय पदार्थ) भरपूर असतात, ज्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास कमी होतो आणि पचन संस्था सुधारते.

– वजन नियंत्रण : सॅलड खाल्ल्याने पोट भरल्या सारखे वाटते, ज्यामुळे आपण अतिरिक्त कॅलरी खाणे टाळतो. हे वजन कमी करण्यासाठी उत्तम आहे.

– पाण्याचे प्रमाण : काकडी, टोमॅटो यांसारख्या भाज्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे शरीर हायड्रेटेड राहते.

– त्वचा आणि केसांसाठी उत्तम : यातील अँटी-ऑक्सिडंट्समुळे त्वचा सतेज होते, केस गळणे कमी होते.

सॅलड मध्ये काय खावे?

– काकडी आणि टोमॅटो हे सॅलडचे मुख्य घटक आहेत.

– गाजर आणि बीट रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी आणि डोळ्यांच्या आरोग्यासाठी उत्तम.

– कांदा चवीसाठी आणि पचनासाठी चांगला.

– कोबी किंवा लेट्युस फायबरसाठी यांचा वापर करावा.

– पालक किंवा मेथीची कोवळी पाने यांपासून लोह मिळवण्यासाठी.

– कोथिंबीर आणि पुदिना यांमुळे चव आणि फ्रेशनेस वाढवण्यासाठी.

– उकडलेले कडधान्यात मूग, मटकी किंवा चणे घ्यावे, यात प्रोटीन भरपूर असते.

– पनीर किंवा टोफू मध्ये प्रोटीन असते.

– उकडलेली अंडी किंवा चिकन मध्ये प्रोटीन असते.

– शेंगदाणे किंवा बदाम मध्ये कुरकुरीतपणा आणि प्रथिनांसाठी उपयुक्त.

– अंबाडीच्या बिया किंवा तीळ ओमेगा-३ साठी.

सॅलड खाताना घ्यायची काळजी

– सॅलडवर जास्त मीठ टाकणे टाळावे, त्याऐवजी लिंबू पिळावे.

– भाज्या वापरण्यापूर्वी त्या कोमट पाण्यात मीठ टाकून स्वच्छ धुवून घ्याव्यात.

– सॅलड जेवणाआधी किंवा जेवणासोबत खावे. रात्री उशिरा सॅलड खाणे काही लोकांना पचनास जड जाऊ शकते.

– सॅलड मध्ये मेयॉनीज किंवा जास्त क्रीम वापरणे टाळावे, कारण त्यामुळे कॅलरीज वाढतात.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

## श्री क्षेत्र नैमिष्यारण्य भागवत कथा व हरिनाम सप्ताह

भागवत कथाकार :
आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर
कथेचे श्रवण करताना धावते संकलन
मधुकर बोरीकर 9403061886

### दिवस पहिला

पुढे.....

तुमच्या अंत:करणात एक भूमिका तयार केली पाहिजे.स्थिर माध्यम हे समाधानाचे माध्यम असते.ध्येय निश्चिती झाली पाहिजे.साधनाची निश्चिती झाली पाहिजे.अनेक साधने असली तरी अस्थिरता असते.हे करू का ते करू या विचारात आयुष्य संपलेले असते.ही शोकांतिका आपली सर्वांचीच आहे.

कर्माची गती गहन आहे. म्हणून माणूस ते सोडून देतो व म्हणतो ज्ञान पण तेही सोपे नाही.

उत्तिष्ठ जागृत..

ज्ञान,माया,ब्रह्म यांच्या अर्थाने ज्ञान अवघड वाटू लागते. मग लोक भक्ती सोपी आहे असे म्हणतात.भक्ती ही तर सुळावरील पोळी.. भक्ती ही सोपी नाहीच. कोण्या भक्ताला क्षणात भगवंत प्राप्त झाला? मग तीही सोडतात कर्म नको, ज्ञान नको,भक्ती ही नाही मग योग या मार्गाला लागतात.

यम,नियम...हे नको सरळ प्राणायाम करतात.युक्त आहार विहार..हे कांहीं विचारच करीत नाहीत.अल्प आहार घ्यावा लागतो.यम नियम,आसन,हे कसोशिने पाळावे लागतात.

*योगश्च चित्त वृत्ती निरोध:*

आमच्या चित्त वृत्ती याचा निरोध व्हावा. आपण सोडत सोडत कर्म सोडले, ज्ञान सोडले,भक्ती सोडली योग सोडला. कोणत्याही साधनांवर निश्चिती नाही.बरेच लोक मार्गात येणाऱ्या अडचणी मुळे मार्ग आक्रमण करीतच नाहीत. विघ्न येईल या भीतीने प्रारंभही करीत नाहीत.कांहीं लोक सुरूच करीत नाहीत कांहीं सुरू करतात अडचण आली की थांबतात तर कांहीं थोडे अडचणी, विघ्ने आली तरी पूर्ण करतात. चांगल्या मार्गाला अडथळे येतातच. सिनेमाला जाताना अडसर येत नाही. वारीला मात्र अडसर येतात. प्रतिबंध चांगल्या मार्गात येतात. आपल्या कडे शेंडी तुटो व पारंबी तुटो.अशी एक म्हण आहे. क्रमश:.....

## लघु बोधकथा

### प्रत्यक्ष अनुभव

एका आश्रमात एक महात्मा राहत होते. त्यांच्या आश्रमात रोज सकाळी व संध्याकाळी धूप जाळला जात असे. धूपामुळे कीडे, कीटक आदींची संख्या कमी होते तसेच वातावरणातील जंतूची संख्याही कमी होते हे महात्म्यांना माहिती असल्याने त्यांनी धूप जाळण्याची पद्धत नित्यनेमाने सुरु ठेवली होती. आश्रमात धूप जाळला जाई तर आश्रमाच्या मागील बाजूच्या गोठ्यात कडुनिंबाचा पाला जाळला जाई कारण कडुनिंबाच्या पाल्याच्या धुरानेही कीडे-कीटक येत नाहीत. आश्रमातील एका शिष्याला मात्र हा भेदभाव पटला नाही. तो महात्म्यांना जाऊन म्हणाला,''गुरुदेव, आपल्याला माणसांना मात्र धूपाचा सुंदर वास तर दूधदूभते देणा-या जनावरांना मात्र कडुनिंबाचा कडवट वास असलेला धूर आपण देत आहोत. हे काही मला बरे वाटत नाही. तसेही आपल्या धर्मानुसार सर्वप्राण्यांमध्ये एकच परमेश्वर वसलेला आहे. आपल्या आत्म्याला चांगला वास आणि पशूंच्या आत्म्याला कडवट वास हे तुम्हाला पटते काय'' महात्मा म्हणाले,'' तुझे हे म्हणणे मलाही पटते. आजपासून तूच दोन्हीकडे धूप जाळत जा आणि एक महिन्यानंतर मला येऊन सांग'' त्या शिष्याने महिनाभर आश्रमात व गोठ्यात दोन्हीकडे धूप जाळला. सर्वत्र सुवास दरवळला होता. महिन्यानंतर तो शिष्य महात्म्यांकडे गेला असता ते म्हणाले,'' अरे मुला, आपल्या आश्रमाला दोन्हीकडे धूप जाळणे हे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. हे खूप खर्चिक होत आहे. तेव्हा काय करायचे हे तू बघ'' शिष्याने मग काहीच न बोलता दोन्हीकडे कडुनिंबाचा पाला जाळणे सुरु केले. किडे,कीटक तर निघून जायचे पण कडवट धुराच्या वासाने आश्रमात येणा-या भक्तांची संख्या मात्र कमी झाली. पंधरा दिवसांनंतर शिष्याला हे लक्षात आले व तो महात्म्यांकडे गेला. त्याने महात्म्यांची क्षमा मागितली व त्यांच्या आज्ञेनुसार पहिल्याप्रमाणे धूप व कडवट पाला योग्य ठिकाणी जाळणे सुरु झाले.

तात्पर्य – प्रत्यक्ष अनुभूती मिळाल्याशिवाय मनुष्य शहाणा होत नाही.

# प.पू.श्री.गोविंदगिरी जी महाराज आळंदी आश्रमात "मनाचे श्लोक" चे विमोचन समारंभ

## मनाचे श्लोकांचे वाचन, पठण व मनन हाच आत्मोन्नतीचा योग्य मार्ग - प.पू. स्वामी श्री गोविंदगिरीजी महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

बाणेर, पुणे - दास नवमीच्या पावन पर्वावर मनाचे श्लोक परिवार व श्रीभगवती सेवा आश्रम यांच्या संयुक्त विद्यमाने ३०,००० मनाचे श्लोक पुस्तिकांचे विमोचन प.पू. स्वामी श्री गोविंदगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाले. याप्रसंगी त्यांनी व्यक्तीच्या आत्मोन्नतीसाठी मनाचे श्लोक हे प्रभावी व कालातीत मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमास समाजसेवक अशोकजी नवाल, सुशिलजी अग्रवाल, संकल्पक गिरीधरभाई राठी,

प्रकाशदादा बोकील, डॉ. श्याम कुलकर्णी, विश्व विक्रमातून शंखश्री पदवी प्राप्त चंद्रकांत जाधव पाटील, तसेच सुधीर अल्करी आदी श्रीभगवती सेवा आश्रमाचे निष्ठावंत कार्यकर्ते उपस्थित होते.

परमपूज्य महाराजांच्या प्रेरणा, मार्गदर्शन व कृपाशिर्वादामुळे आतापर्यंत १ लाख २० हजारांहून अधिक मनाचे श्लोक पुस्तके विविध वस्तीतील मुला-मुलींना वितरित करण्यात आली आहेत. याचबरोबर दास नवमी पर्वाच्या निमित्ताने दि. १/२/२०२६ ते ११/२/२०२६ या कालावधीत विविध सेवावस्त्यांमध्ये मनाचे श्लोक प्रभात फेरी व समूह वाचन असे उपक्रम नियोजित पद्धतीने राबविण्यात आले.

मनाचे श्लोक हा समर्थ रामदास स्वामी यांनी रचलेला २०५ श्लोकांचा प्रभावी काव्यसंग्रह असून तो भुजंगप्रयात छंदात लिहिलेला आहे. या ग्रंथातून मानवी मनाला शिस्त, सदाचार व नीतिधर्माची शिकवण मिळते. क्रोध, काम, मोह, लोभ यांसारख्या षड्रिपूंवर नियंत्रण ठेवण्याचा मार्ग यातून स्पष्ट होतो. नैराश्य, ताण-तणाव व अस्थिर मनासाठी मनाचे श्लोक हा एक प्रभावी उपाय ठरतो.

हा ग्रंथ म्हणजे सामान्य माणसालाही सहज समजेल अशा भाषेत मांडलेला व्यक्तिमत्त्व विकासाचा मानसशास्त्रीय मार्गदर्शक आहे. मनावर संयम, आत्मशुद्धी, कर्तव्यबोध व रामभक्तीची प्रेरणा देणारा हा ग्रंथ आजच्या धकाधकीच्या जीवनात अधिकच मार्गदर्शक ठरत आहे.

# सुख आले माझ्या दारी

**ज्योतिर्मय साहित्य**

सुख आले माझ्या दारी लिहायला पूर्ण वेळ मिळाला नाही, लिहायचे खूप होते, पण अगदी प्रत्येक गोष्ट लिहायची म्हणजे लेख उगाच वाढत जातो. सुखाची व्याख्या एकच ती म्हणजे मनातून मिळणारे समाधान. प्रत्येक गोष्टींची बारीक सारीक उदाहरणे देऊन लेखाची लांबी वाढेल, पण मूळ आशय दूर रहातो.

तसे पाहिले तर प्रत्येक मनुष्य असमाधानी असतो, केंव्हा कारण प्रत्येक दिवशी तो इतरांच्या सुखा बरोबर स्वतःच्या सुखातली कमतरता जाणवू लागतो, शोधू पहातो तेव्हा तो अधिक दुःखी होतो.

त्यासाठी माणसाने समाधानी राहणेच चांगले. कारण हवे आणि हाव कधी संपतच नाहीत. त्याहीपेक्षा आपल्याकडे जे आहे जे मिळाले आहे ते वाढवणे, वाचवणे, वापरणे, वाटणे यामध्ये जे सुख, आनंद आहे ते समाधानी, योग्य अपेक्षित आहे. अवास्तव आकांक्षा, इच्छा या फक्त अतिलोभाला आमंत्रित करतात, जे दुसऱ्याकडे अमाप आहे मला त्यातले काहीच मिळाले नाही., गडगंज संपत्तीचा मोह सुद्धा विनाशास कारणीभूत ठरतो.

देवाने मला जी सद्बुद्धी दिली आहे त्यानेच मी माझे कर्तृत्व दाखवून, आपल्या माणसांचे प्रेम मिळविण्यासाठी, कोणाचीही सदिच्छा, आशीर्वाद किंवा स्नेह मिळविण्यासाठी मी सर्वांशी सलोख्याने वागेन तर सुख आपोआपच आपल्या पायांनी आपल्या

दारी चालत येते त्याच्याबरोबरच समाधान येते.

आणि सुख म्हणजे अतोनात पैसा गोळा करणे नव्हे, तर बुद्धी, कष्टांना मिळणारा पैसा हा कायम, चिरंतन, शाश्वत रुपाने आपल्याला उपयोगी पडतो. आपण संत सज्जनांच्या कथा वाचतो, ऐकतो ते सदैव सुखी समाधानी का असतात तर ते नेहमीच दुसर्याच्या सुखाचा विचार करतात. स्वतःची पर्वा न करता ईश्वराची सेवा करतात, जनसेवा करतात, ते ऐहिक सखोपभोगाच्या मागे लागत नाहीत, तरीपण ते अजरामर होतात. आपण संत होऊ शकलो नाही तरी सुखी समाधानी होण्याचा प्रयत्न करु शकतो.

आज मी सुखी समाधानी का आहे तर मला एवढे पक्के माहित आहे की, सुख ओरबाडता येत नाही, माझ्या कुटुंबात मी का सुखी आहे तर मला माझ्या माहेरच्या सुसंस्कारी आईवडिलांकडून मिळालेली देणगी आहे, की जे आपण कष्टाने मिळविले आहे ते आपले हक्काचे आहे. जे आपल्या योग्य आहे तेच देवाने निवडून वेचून आपल्याला दिले आहे, ते सांभाळणे, वाढवणे, योग्य ठिकाणी त्याचा विनियोग करणे, योग्य तर्हे ने वापरणे म्हणजेच समाधान मिळते. जमेल त्या स्वरुपात इतरांना मदत करणे म्हणजे सुख असते ते समाधानाने मिळणारे सुख शाश्वत असते. माझे पती नेहमी म्हणतात की, आपल्यापेक्षा श्रीमंत माणसांकडे पाहण्यापेक्षा आपल्यापेक्षा गरीब माणसांकडे पहा म्हणजे आपल्याला कळेल की, आपण किती श्रीमंत आहोत, आपण त्या व्यक्तीला मदत करु शकतो.

स्वप्नगंधा सतीश आंबेतकर
कला शिक्षिका, विरार मुंबई
मो. 97301 74088

मिस्टरांचे गुरु होते ते नेहमी सन्मार्गाचीच शिकवण देत असत, आणि त्यामुळेच सन मार्गावरुन चालण्यासारखे शाश्वत सुख नाही.

आपण दुसऱ्यांनी नम्रतेने वागणे यासारखे समाधान नाही. सुख म्हणजे फक्त भौतिक सुखाचा वरवरचा देखावा नाही तर, सर्वांशी, मनाशी प्रामाणिक राहून मिळालेले वैभव हेच खरे सुख आहे. हेच सुख माझ्या दारी आहे. मुलींनाही आम्ही तशीच शिकवण दिली आहे.

त्यामुळे मी खूप आनंदी समाधानाने म्हणू शकते की

सुख आले माझ्या दारी
काही उणे न या संसारी,
जे मिळाले, ती देवकृपा
अजुन काय हवे मज तरी!
जे सौख्याचे क्षण वेचले
त्याने आयुष्य घडत गेले
जे मिळाले ते नशिबी होते
सुख समाधानात मी न्हाले.
काय हवे अजुन मजला
स्व बुद्धी ने विकास झाला
सद्भावना मनी ठेवुनिया
सौख्याने संसार मोहरला.
सुखाचे क्षण हृदयी जपुनी
संसाराची कास धरोनि,
उभी राहिलेच निश्चयाने
सुख आले दारी चालुनि.
सुख न मिळे कधी मागुनी
ते शोधावे आत्मसमर्पणी,
देवाचे आशिष मानता मनी
सुखसमाधान येई दारी हसुनि.

# सौ. मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांना उत्कृष्ट पर्यावरण निबंध पुरस्कार

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - वनराई संस्थेच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठेचा उत्कृष्ट पर्यावरण निबंध पुरस्कार यंदा ज्योतिर्मय साहित्याच्या लेखिका व सुप्रसिद्ध समीक्षिका सौ. मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांना प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार समारंभ टिळक स्मारक मंदिर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. वनराई पर्यावरण बालोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमास राष्ट्रीय पुरस्कार विजेता बालकलाकार श्रीनिवास पोकळे (नाळ चित्रपटातील 'चैत्या'), तसेच वनराई संस्थेचे अध्यक्ष रवींद्र धारिया यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

पद्मविभूषण डॉ. मोहन धारिया यांच्या १०१व्या जयंतीनिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड आणि जागरूकता या विषयांवर आधारित विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणप्रेमाची भावना दृढ करण्याचा या उपक्रमाचा उद्देश होता.

या प्रसंगी शिक्षक गटातून उत्कृष्ट निबंधासाठी सौ. सोनपेठकर यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पर्यावरण विषयावरील त्यांच्या अभ्यासपूर्ण, संवेदनशील आणि प्रभावी लेखनाची दखल घेत पारितोषिक प्रदान करण्यात आले.

या उल्लेखनीय यशाबद्दल ज्योतिर्मय साहित्य परिवाराच्या वतीने सौ. सोनपेठकर यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून, त्यांच्या पुढील साहित्यिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# थोर क्रांतिकारी संत श्री सेवालाल महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

आज १५ फेब्रुवारी, बंजारा समाजातील महान क्रांतिकारक संत श्री सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती. मध्ययुगात भारतात अनेक क्रांतिकारक संत महात्मे होऊन गेले ज्यांनी आपल्या आपल्या वर्तनातून, कीर्तनातून, विचारातून समाजात भक्तिभाव तर निर्माण केलाच पण येणाऱ्या अनेक पिढ्यांना मार्गदर्शन होईल असे तत्वज्ञान सांगितले त्यात श्री संत श्री सेवालाल महाराज हे एक होते. संत श्री सेवालाल महाराज यांचा जन्म १५ फेब्रुवारी १७३९ रोजी तांडा गुत्ती बेल्लारी अनंतपुर जिल्हा आंध्रप्रदेश या ठिकाणी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भीमा नाईक असे होते. भीमा नाईक हे त्याकाळात अतिशय श्रीमंत व्यक्ती म्हणून ओळखले जात. असे म्हणतात की भीमा नाईक यांच्या घरी इतकी श्रीमंती होती की त्यांच्या सात पिढ्या बसून आरामात जेवण करतील. त्यांच्याकडे सुमारे पाच हजार बैल आणि गाया होत्या. ते ४१ तांड्यांचे नायक होते. घरी लक्ष्मी पाणी भरत असूनही सेवालाल महाराजांचे मन रमत नव्हते. आपल्या बंजारा समाजातील लोक जुन्या रूढी परंपरांना कवटाळून बसला असल्याने बंजारा समाज इतर समाजाच्या मानाने खूप मागे आहे. या समाजातील हाच मागासलेलापणा दूर करण्यासाठी काही तरी करावे असे त्यांना सतत वाटत होते. त्यांच्या आई धर्मली यांनी त्यांना लहानपणीच वीरांच्या गोष्टी सांगितल्या होत्या. आईच्या शिकवणुकीचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. आपल्या बंजारा समाजात अनेक अनिष्ट चालीरिती आहेत. या अनिष्ट चालीरिती मुळेच समाज मागे आहे हे त्यांनी जाणले. बंजारा समाजाला इतर समाजाच्या बरोबरीने न्यायचे असेल तर त्यांच्यात असणाऱ्या अनिष्ट, बुरसटलेल्या चालीरिती बंद करून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण केला पाहिजे असा विचार करून त्यांनी समाजामध्ये जनजागृती केली. बंजारा समाजातील बांधवांनी अंधश्रद्धेला मूठमाती द्यावी असा त्यांचा आग्रह असायचा. अंधश्रद्धेमुळेच समाज मागे आहे असे त्यांचे ठाम मत होते. कोणत्याही गोष्टीवर डोळे झाकून विश्वास ठेवू नका. कोणतीही गोष्ट पारखून, समजून घ्या मगच विश्वास ठेवा असे ते म्हणत. त्यांना गरीब - श्रीमंत, स्त्री - पुरुष असा भेदभाव मान्य नव्हता म्हणूनच घरची श्रीमंती असूनही त्यांनी आपल्या पुतण्याच्या विवाह एका गरीब कुटुंबातील मुलीशी लावून दिला होता. २५० वर्षापूर्वीच श्री संत सेवालाल महाराजांनी स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाची शिकवण समाजाला दिली होती. श्री संत सेवालाल महाराज हे केवळ थोर विचारवंतच नव्हते तर ते एक थोर सेनानीही होते. दिल्लीचा नवाब गुलाब खान मोहंमद खान याच्याशी सेवालाल महाराज यांच्याशी लढाई झाली या लढाईत सेवालाल महाराजांनी मर्दुमकी गाजवत विजय मिळवला. श्री संत सेवालाल महाराजांनी भारतीय स्वातंत्र्याचा जाहीरनामा तयार केला त्यावेळी उमाजी नाईक, तंट्या भिल्ल यासारखे शुर सेनानी त्यांच्यासोबत होते. भारतीय इतिहासातील थोर विचारवंत आणि थोर सेनानी अशी ओळख असलेल्या श्री संत सेवालाल महाराजांचे २ जानेवारी १७७३ रोजी रुईगड, तालुका मानोरा जिल्हा वाशिम येथे निधन झाले. थोर विचारवंत, समाजसेवक त्याच सोबत शुर सेनानी असणाऱ्या श्री संत सेवालाल महाराजांचे विचार आजच्याच पिढीला नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्यांचे विचार आत्मसाद करून त्या विचारांवर चालण्याचा संकल्प करणे हीच त्यांच्या जन्मदिनी त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. थोर विचारवंत, थोर सेनानी श्री संत सेवालाल महाराजांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

SWP की अक्षय पात्र ?

मित्रांनो काल परवा तुम्ही माझ्या लेखातून SWP बद्दल माहिती वाचलीत या अक्षय पात्राची तुलना SWP बरोबर होईल का?
मला तर अक्षय पात्र आणि SWP यांच्यात खुपचं साम्य आहे असे वाटते, नव्हे ते आहेच.
तुम्ही एकदा म्युच्युअल फंडामध्ये पुरेशी इन्व्हेस्टमेंट केली आणि SWP ॲक्टिव्हेट केले की दरमहा नियमित उत्पन्नाची अविरत अशी गंगा यातुन वाहू लागते....या गंगाजळीतुन तुम्ही आवश्यक तेवढे अथवा गरजे इतकेच पैसे काढत राहिलात तर ही गंगाजळी घटण्या ऐवजी वाढत जाते.
म्हणजे आज तुमच्या गंगाजळी तुन तुम्ही फिक्स्ड डिपॉझीटच्या व्याजा सारखेच पैसे घेत राहिलात तर म्युच्युअल फंड निर्माण करत असलेल्या अतिरिक्त रीटर्नस मुळे गंगाजळीत भर पडत राहते.
तुम्ही तुमच्या साठी आणि कुटुंबा साठी अक्षय पात्र बनवा, SWP करा.
अक्षय पात्राची कथा आपल्याला शिकवते की, जिथे खरी भक्ती आणि श्रद्धा असते, तिथे ईश्वर स्वतः भक्ताच्या मदतीला येतो आणि थोड्याशा अर्पणातही (SIP) संपूर्ण कुटुंबाला तृप्त करण्याची शक्ती असते.



दुकान भाड्याने देणे आहे.
300 स्वेअर फूट दुकान भाड्याने देणे आहे.
डॉक्टरांना प्राधान्य.
इंदुगंगा आर्केड,
राहुल मेडिकलच्या बाजूला,
क्रिकेट स्टेडियम जवळ,
एन 2, मेन रोड,
सिडको छ. संभाजीनगर
संपर्क :
9823195585/ 8149998143

ऑनलाईन औषधोपचार

आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज, गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे. सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.
Dr Shaikh A H - 98606 99906

# कर्ड पाम्लेट

**ज्योतिर्मय साहित्य**

काय? नाव वाचून उत्सुकता वाटतेय ना,कसा असेल हा पदार्थ? स्नॅक्सचा की जेवणात असेल हा, गोड की तिखट असेल? बनवायला वेळ खाऊ ,किचकट की झटपट बनणारा असेल? स्टार्टर की डिझार्ट असेल.. कित्येकाना तरी हा नक्की व्हेजिटेरियन पदार्थच असेल ना? अशी शंका सुद्धा आली असेल,हो ना? मग आता जास्त डोक्याला ताण न देता सरळ पहाच ना बनवून! त्यासाठी साहित्य तर सगळे घरात असतेच फक्त ब्रेड मात्र आणावा लागेल ,तो सुद्धा घरात असेल तर सुरु करा लगेंच बनवायला..

**साहित्य :**

आठ ब्रेडचे स्लाईस,..ते सँडविच ब्रेडचे किंवा कोणत्याही आकारातील,आवडत्या प्रकारचे असले तरी चालतील फक्त बॅटर त्यानुसार थोडेसे कमी जास्त बनवावे , एक वाटी गोड दही, अर्धी वाटी बेसन, एक चमचा बारीक रवा, तीन,चार मिरच्यांचे एकदम बारीक कट केलेले तुकडे, पाव वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, पाव वाटी एकदम बारीक चिरलेली कांद्याची पात असल्यास उत्तम, ५..६ लसूण पाकळ्या व अर्धा इंच आले यांचे एकदम बारीक कट केलेले तुकडे,थोडे काळे तीळ, पाव चमचा ओवा, पाव चमचा जिरे, पाव चमचा हिंग, पाव चमचा हळद, मिठ व किंचित साखर चवीनुसार, अर्धा चमचा खाण्याचा सोडा, तेल किंवा बटर.

**कृती :**

प्रथम ब्रेडच्या कडा काढून घ्याव्यात. मग बॅटर बनवायला घ्यावे. त्यासाठी एका बाऊल मध्ये दही घेऊन त्यात चवीसाठी किंचीत साखर घालावी.आता त्यात बेसन व रवा घालून व्हिस्करने छान फेटावे. हळूहळू पाणी घालत भज्याच्या बॅटर प्रमाणे थोडेसे सैलसर बनवावे. नंतर त्यात आले, लसूण, मिरच्यांचे तुकडे, कोथिंबीर, कांदापात, हिंग, हळद, ओवा, जिरे, काळेतीळ घालून चवीनुसार मीठ घालावे व बॅटर पुन्हा छान फेटावे. आता गॅसवर एक शक्यतो नॉनस्टिक तवा गरम करण्यास ठेवावा. शेवटी बॅटर मध्ये सोडा किंवा इनो घालून मस्त फुगून हलकेपणा येईपर्यंत गोलाकार फेटावे. आता तवा गरम झाला असेल. तो मध्यम आचेवर ठेवून त्यावर शक्यतो बटर लावावे नसल्यास तेल पण चालते. नंतर बॅटरमध्ये ब्रेडचा स्लाईस व्यवस्थित बुडवुन तो तव्यावर शालोफ्राय करण्यास ठेवावा. तवा मोठा असेल तर एकाचवेळी चार स्लाईस पण ठेवता येतात. मग बटर सोडत दोन्ही बाजू खरपूस भाजून घ्याव्यात. आणिआपला सुंदर गोल्डन कलरचा तयार पाम्लेट टोमॅटो केचप किंवा चटणीसोबत गरमगरम खाण्यास द्यावा.

वैशिष्टय:

ही डिश ब्रेकफास्ट साठी, मधल्या वेळच्या भुकेसाठी किंवा अगदी लाईट आणि चेंज म्हणून डिनरला सुद्धा बनवू शकतो. मित्र,मैत्रिणींच्या छोट्या पार्टीसाठी ही चटपटीत डिश ठेवली तर सगळेजण नक्कीच तुटून पडतील यात शंकाच नाही. हे बनवायला झटपट,दिसायला आकर्षक, खायला



सौ. स्नेहा मुसरीफ,
पुणे

चटपटीत व इतके टेस्टी बनतात की मुलांपासून ते आजीआजोबांपर्यन्त सगळ्यांनाच मनापासून आवडेल. ब्रेडचे पकोडे बऱ्याच लोकांना आवडतात, पण ते तळलेले असल्यामुळे खूपच तेलकट बनताता. त्याच्या ऐवजी हा ऑप्शन खूपच आवडेल सर्वांना! आवडत असतील तर ब्रेडच्या कडा सुद्धा काढल्या नाहीत तरी चालतात. डाळीच्या पिठामुळे जरी थोडेसे वातुळ होईल असे वाटत असले तरी त्यात हिंग, ओवा, आलं लसूण यासारखे घटक पदार्थ सुद्धा असल्यामुळे त्रास होत नाही. सोड्यामुळे छान फुगून हलकेपणा येतो. तर रव्यामुळे मस्त टेक्श्चर येते. दह्यामुळे तर याची लज्जत काही न्यारीच लागते. दही आणि बटर यांच्या कॉम्बिनेशनमुळे तर पनीरसारखा फील येतो.कलोंजी किंवा काळे तीळ बॅटरमध्ये घालण्यापेक्षा भाजताना वरून भुरभूरले तरी छान दिसतात. काय,आवडली ना रेसिपी? मग बनवा लगेंच ..

***

## कवितेच्या लाटावर...

*वर्णन शिवाचे*

*राजा कैलासीचा | आहे महादेव |*
*दिसते वैभव | ठाई ठाई || १ ||*

*वाचे हरहर | म्हणत रहावे |*
*रुद्रासी पहावे | मनामध्ये || २ ||*

*त्रिशूल डमरू | आहे त्याच्या हाती |*
*गळ्यात शोभती | सर्प हार || ३ ||*

*आनंदे मस्तकी | गंगा खेळतसे |*
*कमंडलू दिसे | चरणाशी || ४ ||*

*भस्माचे लेपन | दिसे अंगावर |*
*खाली व्याघ्रांबर | बैसण्यास || ५ ||*

*तिसरे नयन | भाळी दिसतसे*
*चंद्र हसतसे | डोईवर || ६ ||*

*वर्णन शिवाचे | शब्दात मांडले |*
*शंकरा बोलले | सुखी राहा || ७ ||*

*©® नारायण पांडव.*
*छ.संभाजीनगर.*

कधी कधी
अपेक्षाही मरून जातात.
मरगळ येते मनाला त्याला
शांत व्हा सांगून जातात.

आपले डाव हारून
हारून जिंकण्याचे
स्वप्न नको बघूस
जणू सांगून जातात

कधी कधी
प्राक्तन संपणार नाही
हे शब्द कानात घुमतात
तेव्हा बहिरे का झालो नाही
असे प्रश्न पडून जातात.

रडून घ्यावे आपलेच आपण
कोणी येतच नाही हे जुने नित्य
येणारे अनुभव एकटेपणा
चिरंतर याची जाणीव करून देतात.

उपयोग झाला कि वस्तूसारखे
बाजूला फेकले गेलो.
हे शल्य कुणाला सांगावे ?
करणारे आपलेच होते हे परक्यांना
तरी का सांगावे ? हे प्रश्न
एक कोडे निर्माण करतात.

आला दिवस ढकलतोय आपण
हे गुपित राहू द्यावे हे समजूतदार
शब्द मनाला शिकवून जातात.
कधी कधी म्हणतोय पण
रोजचेच कित्येक वर्षे
असेच हे कुठवर ? तेव्हा
धारा वाहू लागतात.

पुसणारे कोणी नाही.
त्यांना माहित असावे
म्हणून डोळे कोरडेच
आपणहून होतात.
निरपेक्ष रहायचंय पण
जमत नाही थकलेल्या मनाला
संवाद माझेच सांगून जातात.

प्रत्येकाला कुणी तरी
आहे. पण आपण असूनही
एकाकी मग किती वर्षे
हसण्याचे नाटक आयुष्याच्या
रंगमंचावर करायचे ?
ह्याची उत्तरेच नसतात.

डोळे मिटले कि अंधाराने
कवटाळावे.
पुन्हा मुखवटा चढवून
आज कुठली अपेक्षा
नाही म्हणत इथे खुपजण एक
नाटकच करत असतात.
कधी कधीचे रूपांतर रोजचे झाले
तरी केविलवाणे हसत असतात.

इथे रडले तरी दुबळे
समजून प्रहार करतील
आपले, परके
या गोष्टी माहित असतात

Show must go on.
हे नाटक चालू ठेवायचेच
हा प्रयत्न कधी कधी चा
रोजचाच
जवळ जवळ सर्वांचाच.
या व्यथा सर्वत्र दिसतात.

प्रारब्ध, अपेक्षा याचा
गुंता सोडवण्यातच
आयुष्य सरून गेले
हे शब्द मात्र कायम
स्मरणात राहतात
स्मरणात राहतात.

माधुरी पळणिटकर.
9921495533

## कवितेच्या लाटावर...

*कॅलेंटाईन डे*

*शिशिर ऋतूच्या मंद वाऱ्यात*
*हळूच एक गाणं सुचतं,*
*मनाच्या कोपऱ्यात दडलेलं*
*प्रेम आज गालात हसतं.*

*नजरेतून उमटलेले शब्द*
*ओठांवर येऊन थांबतात*
*पण एका हसण्याने सारी*
*गुपिते उलगडली जातात.*

*गुलाबाच्या पाकळ्यांवरती*
*आठवणी अलगद विसावतात,*
*स्पर्श नसला तरी भावना*
*हृदयाशी येऊन राहतात.*

*नातं हे फक्त नावाचं नसतं,*
*ते तर विश्वासाने फुलतं,*
*एकमेकांच्या साथीतूनच*
*जीवन अधिक सुंदर होतं.*

*व्हॅलेंटाईनचा हा दिवस*
*नसतो फक्त प्रेमिकांसाठी*
*प्रेमाची ही भेट असते*
*आई-वडील अन साऱ्यांसाठी*

*उद्धव भयवाळ*
*छत्रपती संभाजीनगर*
*मो. ८८८८९२५४८८*

*खूप काही तुला सांगावंसं वाटतं !*

*खूप काही तुला सांगावंसं वाटतं,*
*तुझ्या डोळ्यांत बघून थोडं स्वर्गसुख घ्यावंसं वाटतं.*
*तुझा सुगंध मला ओढ लावतो,*
*तो सुगंध शोषणारं*
*फुलपाखरू व्हावंसं वाटतं.*
*तुझ्या ओठांतून जे शब्द निघतात,*
*त्या शब्दांचा स्वर मला व्हावंसं वाटतं.*
*तू हसत-खेळत आयुष्याची पावलं टाकशील,*
*तो रस्ता मला व्हावंसं वाटतं.*
*तू हसताना खूप गोड दिसतेस,*
*त्या चेहऱ्यावरचा हर्ष मला व्हावंसं वाटतं.*
*तुझ्या गजऱ्यातलं एक फूल मला बनावंसं वाटतं,*
*तुझ्या अवतीभवती*
*कायम चिटकून राहावंसं वाटतं.*
*तू रात्री चांदोबाकडे बघत बसतेस,*
*तो चांदोबा मला व्हावंसं वाटतं.*
*तुझ्या आयुष्यात प्रकाश पसरवावंसं वाटतं,*
*तुझ्या कुशीत जन्मभर झोपावंसं वाटतं.*
*खूप काही तुला सांगावंसं वाटतं,*
*खूप काही तुला सांगावंसं वाटतं.*



*@राहुल गळवे, पुणे*

आई

जीवनाचा आलेख असते आई
आयुष्यात पाठिंबा असते आई

आत्मा आणि ईश्वर यांची निर्मिती
आगळी कलाकृती असते आई

लेकराचे अपराध नेहमीच
पोटात घालणारी असते आई

निरागस आणि निष्पाप बाळाची
पहिलीच शिक्षिका असते आई

संकटात पाठीशी खंबीर उभी
मुलांची एक ढाल असते आई

निःस्वार्थ प्रेम व संस्कार देणारी
देवाचीच देणगी असते आई

मार्गच दिसेनासा होई त्यावेळी
अंधारातील दिवा असते आई

अरविंद कुळकर्णी
मो.९८२२६४२२९४

शुगर....

लहानमोठ्याना झालीय बाई शुगर
या शुगरन झालेत लोक बेजार ।।ध्रु।।

बसायला खुर्ची, फिरायला कार
कामाचा ताण वाढलाय फार,
जेवणात पोळी, तुपाची धार,,
किलोकिलोन झालीत वजनदार,,,
लिफ्टन मजले उतयतोय शंभर,,
या शुगरन झालेत लोक बेजार,, ।।१।।

भाकर आता आवडत नाही
खारी बिस्कीट पाहीजे आई
दो मिनट मॅगी, पिझ्झा खाई
मोबाईल मधून वर बघत नाही,,,
खेळायला जायच येतय मुलांच्या
जीवावर,,,
या शुगरन झालेत लोक बेजार,, ।।२।।

सकाळी उठून फिरायला जा,
सुर्याची किरणे अंगावर घ्या
हसून खेळून राहा जरा
कमी करा आपला च तोरा
नेहमीच गोडधोड खाण नाही बर,,
या शुगरन झालेत लोक बेजार,,, ।।३।।

पैशाला जीव लावा कमी
अडीनडीला या ही कामी
ऐका भजन कीर्तन संत वाणी
अजून काय सांगू आणि?
आनंद फुकट मिळतो,
मागु नका उधार,,,
या शुगरन झालेत लोक बेजार,, ।।४।।

©®©®
सौ. मनोरमा भारत बोराडे
छ. संभाजीनगर




कलम माझी

कलम माझी सोबती
लिहीताना मसी आणि
शाई कलम माझी सखी
लिहीण्यास दौत आणि
कलम माझी सोबती
कलम लिहीते कविता
कलम लिहीते कथा
कादंबरी आणि पुस्तके
ती कलम माझी सोबती
मोरपंखी कलम होती
मसी म्हणजे शाई आणि
टाक म्हणजे कलम ती
नाम लिहीते कलम कधी
करिते स्वाध्याय कलम ती
ज्या गोष्टी घडल्या जगी
ज्या गोष्टी बिघडल्या
त्या लिहीते कलम ती
अभ्यास करिते कधी
कधी करिते निरूपण
किर्तन प्रवचन कधी
अशी कलम माझी
कलम होती झाडे कधी
त्यांना फळे लडगती
कलम म्हणजे कायदा
विधी या विषयातली
अपराध घडतो तेव्हा
शिर कलम होते कधी
अशा प्रकारे पाहिले
तीन विषय कलमेचे
कलम होते कठोर जेव्हा
शहर नाका बंदीचे
कलम कुंचला येता
होती तयार व्यंगचित्रे

अलकानंतसूत श्रीपाद दसरे
छ. संभाजीनगर.
मो.9975950801



पावली ..

खुल्या सभेत सांगा
आम्ही देऊ सावली
पदरपांघरु दु:खिता
बनूआपली माऊली

श्रेय घ्यायचे खुशाल
लाखो झाडे लावली
रोपे सर्व बाभळीची
कुणीचं नसे पाहिली

रक्षण कर्ते महिलांचे
लोकांभासे बाहुबली
सूत्रे देई आपलेहाती
बने कळसूत्रीबाहुली

उत्साहात सुरूकेली
सुभोजथाली ठेवली
कोण तपासे हिशोब
कितीभुकेली जेवली

चला चांगले निमित्त
सत्ताआमिषे धावली
कटोरा नेत्यांचे हाती
संधी पहाया घावली

एकदा जिंकून येतो
चालो उलट पावली
परेशान करुजनतेस
हरेक पावलोपावली

हेचं असेच चालणार
जनता पण सरावली
चालून जाते सगळेचं
नेत्या जात निर्ढावली

स्यमंतक ..

जे अगदी जवळचे
तेचं अधिक घातक
चूक असू दे नसू दे
डोईवर बसे पातक

जो अति विश्वासक
बनवा तया हस्तक
अफवाघुसवा खोल
भडकू टाक मस्तक

कसे चाललेअंतस्थ
गुप्त बातम्या वर्तक
तालावरतीकसरती
करावे त्यांना नर्तक

भेद छेद परिवारांत
बनवा कुटुंब कर्तक
उलटे फिरवतोकाटे
होऊ शके निवर्तक

फुटत नसे सहजते
महान निष्ठा द्योतक
निष्काम सेवासादर
साक्षातनिष्ठा अर्तक

जयचंद मिळे सर्वत्र
नजरअसता शोधक
कसे उलथलेआसन
हतबलबने संशोधक

प्रयोग जरी उलटला
कुणास सोयरेसुतक
ध्येय आपले एकचि
हवी सत्ता स्यमंतक

- हेमंत मुसरीफ पुणे
9730306996

॥ ओम् नमः शिवाय ॥

ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय.
देवा हो देवा तुम्ही महादेवा,
नतमस्तक चरणी आशिर्वाद द्यावा... धृ....
चंद्र, डमरू अन् त्रिशुळ धारी,
अल्प बुध्दी अन् मन हे अविचारी,
म्हणूनिया देवा आले तुझिया द्वारी,
दाखवा मार्ग चालण्या सन्मार्गावरी.
सुविचारांचा लाभू दे अनमोल ठेवा...१...
देवा हो देवा...
ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय

दुधाची ती धार, मनो देई आधार,
बेल फुल अन् एक मुठ साळी,
चरणाशी देवा पूजा भोळी भाळी.
चूक भूल माफी,स्वीकारावी
सेवा...२...
देवा हो देवा...
ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय,
ओम् नमः शिवाय.
एका हाती सुखं, एका हाती
दुःख मिटली ओंजळ,
दोन्हीं साठी अंगी संचारू दे बळ.
जीवनाच्या वाटेवरचा अनमोल
ठेवा...३..
देवा हो देवा..

© सौ.वैशाली महाडिक.
श्री क्षेत्र निनाम - सातारा
संपर्क क्र.-९७६७४३७९२३

✍

चंद्र असे हा पूर्ण कलेचा
भासे मम तो शुभ्र कपाशी
सामान्य अशी ही प्रज्ञा माझी
असामान्य जाहली जराशी...

वाटणे ,भासणे हाच खरा हा खेळ
सावल्यांचा
अपूर्ण कला मग पूर्ण असती पौरव
चैतन्याचा...

शुभ्र बिंब मग धरु पाहते मन हे
चंचल माझे
त्यातच रमले तन मन माझे
शशिधर हृदयी विराजे....

भगवंत हृदयस्थ आहे 🙏

@ अपर्णा.....



*"माणसा! राख लाज मनुष्यत्वाची !*

*आकाश चांदण्यांचे रिते रिते कसे हे झाले!*
*विळख्यात प्रदूषणांच्या लूप्त होवून गेले!*
*मस्त बहरलेले चांदणे विलसायचे आकाशात*
*कधीकधी इंद्रधनुष्यही बहरलेले दिसे त्यात!*

*निर्मळ,निवांत,अथांग,बहूभव्य व शांत आकाश*
*घेते सामावूनी ढग,विमान,पक्षी,तारे यांना कवेत*
*ईश्वराची अद्भूत लिला आहे धरती नि आकाश*
*परि, माणूस घेत आहे ओंढवून स्वतःचा विनाश*

*धनलालसेने माणसांची भ्रष्ट झाली आहे मती*
*त्यांना नको आहे जगती इतर कोणांची प्रगती*
*द्वापारयुगी राक्षस तपश्चर्येने वरदान प्राप्त करीत*
*ऋषीमुनींचा त्याआधारे बहू छळ करीत असत*

*कलियुगी मात्र,माणसांना कष्ट नको कोणतेही*
*अत्याधुनिक तंत्रज्ञानानेअमाप जनांना फसविती*
*माणसांची आहे झाली कसली अनीती जगती!*
*धर्म स्थापण्या भगवंत अनेक रुपे अवतार घेती*

*काव्यरचना: मधुकर निलेगावकर, पुणे*
*९४२१३७५६९१*

श्री सज्जनगड ॥

श्री सज्जनगड । अत्यंत पावन ।
गड हा महान । महाराष्ट्री ॥१॥
येथेच तो होता । समर्थांचा वास ।
म्हणून तो खास । ऐसा आहे ॥२॥
येथे शिवबाने । वाडा बांधियेला ।
आणि तो दिधला । समर्थांना ॥३॥
होता एक खड्डा । शेजारी वाड्याच्या ।
त्याला भरण्याचा । यत्न होता ॥४॥
शिवाजी राजांना । वदले समर्थ ।
हेच सारे व्यर्थ । करू नका ॥५॥
ह्याचा उपयोग । खचित होणार ।
खड्डा भरणार । आपोआप ॥६॥
समर्थ स्थापिले । जागोजागी मठ ।
एक होता मठ । अर्णी गावी ॥७॥
हे अरणी गाव । आहे दक्षिणेत ।
मूर्तीसाठी ख्यात । नाव त्याचे ॥८॥
हवी होती एक । मूर्ती समर्थांना ।
करण्या अर्चना । दैनंदिन ॥९॥
वृद्ध कारागीर । एक शोधियेला ।
विनविले त्याला । मूर्तीसाठी ॥१०॥
त्याला सांगितले । घडव तू एक ।
मूर्ती ती सुरेख । श्रीरामाची ॥११॥
त्यात हवे आहे । श्री पंचायतन ।
करण्या पूजन । त्याचे नित्य ॥१२॥
कारागीर वदे । मज आहे ठावे ।
हे की तुम्हा हवे । आहे काय ॥१३॥
मी हा असा वृद्ध । अधू माझे नेत्र ।
दिसतो सर्वत्र । अंधःकार ॥१४॥
मी ना पाहू शके । चित्र श्रीरामाचे ।
कैसे करू त्याचे । मूर्तीरूप ? ॥१५॥
समर्थ वदले । पाहण्या श्रीराम ।
चर्मचक्षु काम । ना करती ॥१६॥
रामाचे दर्शन । अंत:चक्षु पुढे ।
होईल, तिकडे । ध्यान ठेव ॥१७॥
तुझ्याच शरीरी । असे आत्माराम ।
त्याला तू प्रणाम । कर आता ॥१८॥
ऐसे म्हणोनिया । स्वामींनी लाविला ।
हात मस्तकाला । त्या वृद्धाच्या ॥१९॥
डोईस लागता । समर्थांचा हात ।
हरपले चित्त । त्या वृद्धाचे ॥२०॥
त्याच्या चक्षु पुढे । आला तेज गोळा ।
त्याने तो पाहिला । प्रभू राम ॥२१॥
दिली दिव्य दृष्टी । समर्थांनी त्यास ।
बनविण्या खास । राम मूर्ती ॥२२॥
वृद्धाने त्वरित । मूर्ती बनविल्या ।
समर्था अर्पिल्या । भक्ती भावे ॥२३॥
वृद्ध मग म्हणे । करा तुम्ही आज ।
पुन्हा अधू मज । दृष्टीहीन ॥२४॥
समर्थ वदले । दृष्टीने कायम ।
पहा प्रभू राम । निरंतर ॥२५॥
त्यानंतर मग । अनुग्रह त्याला ।
समर्थ दिधला । सत्वरच ॥२६॥
त्या साऱ्याच मूर्ती । नीट पाहताना ।
कळली सर्वांना । एक गोष्ट ॥२७॥
डोळे ना कोरले । रामाच्या मूर्तीचे ।
नवलच ह्याचे । वाटे सर्वां ॥२८॥
कारागीर म्हणे । पाहिले म्या जैसे ।
बनविले तैसे । राम मुख ॥२९॥
समर्थांनी मग । ते पंचायतन ।
आणले जपून । गडावर ॥३०॥
तेथे शेजघरी । ठेविल्या त्या मूर्ती ।
त्यांची महा कीर्ती । पसरली ॥३१॥
समर्थ नेहमी । पूजित मूर्तींना ।
त्या पंचायतना । मनोभावे ॥३२॥
माघाच्या मासात । वद्य नवमीला ।
कल्लोळ जाहला । गडावर ॥३३॥
होते पद्मासनी । समर्थ बैसले ।
त्रिवार वदले । रामनाम ॥३४॥
त्यांच्या देहातून । पुढच्या क्षणात ।
निघे प्राणज्योत । गोळारूपी ॥३५॥
तेजाचा तो गोळा । रामाच्या मूर्तीत ।
प्रवेश करत । विसावला ॥३६॥
साऱ्यांनी पाहिले । समर्थ त्वरित ।
विलीन झालेत । राम रूपी ॥३७॥
केलेय दहन । पार्थिवाचे त्यांच्या ।
नजीक वाड्याच्या ।"त्या"खड्ड्यात ॥३८॥
त्याच खड्ड्यातून । दुसरे दिवशी ।
स्वयंभू समाधी । प्रकटली ॥३९॥
संभाजी राजांनी । त्याच जागेवर ।
बांधले मंदिर । समाधीचे ॥४०॥
समाधी मंदिरी । हीच राममूर्ती ।
स्थापियेली होती । उच्च स्थानी ॥४१॥
समर्थांचे प्राण । मूर्तीत आहेत ।
ऐसे मानतात । सकळिक ॥४२॥
प्राणांची प्रतिष्ठा । मूर्तीत म्हणून ।
केलेली नसून । वंद्य आहे ॥४३॥
माधव हा म्हणे । ऐशा समर्थांना ।
करूया वंदना । मनोभावे ॥४४॥
जय जय रघुवीर समर्थ

© माधव मनोहर जोशी

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# शिव हर शंकर नमामि शंकर ...

**ज्योतिर्मय साहित्य**

''महाशिवरात्र'' हिंदु बांधवांचा एक पवित्र सण जो अतिशय भक्तिभावाने सर्वत्र साजरा करण्यात येतो. हा दिवस भगवान शिव व माता पार्वती यांचा विवाह दिवस. या दिवशी भोलेनाथाने अलिप्तपणा त्याग करून, गृहस्थ जीवन स्वीकारले होते. या दिवशी व्रत केल्याने सौभाग्य प्राप्त होते. महाशिवरात्री हा उत्सव माघ कृष्ण चतुर्दशी या दिवशी संपन्न होतो. इंग्रजी महिन्यानुसार हा उत्सव साधारणत: फेब्रुवारी किंवा मार्च महिन्यात येतो. सर्व देवांमधे भगवान शिवाचे महत्व अधिक असून हा दिवस अत्यंत पवित्र वातावरणात साजरा केला जातो. या दिवसाचे महत्व सांगत पुराणात अनेक कथा सांगितल्या आहेत. ज्यावेळी समुद्र मंथन झाले त्यात सृष्टीशी निगडीत सर्व गोष्टींची निर्मीती झाली परंतु त्याचवेळी समुद्रमंथनातुन हलाहल विष देखील बाहेर आले. या विषात ब्रम्हांडाला नष्ट करण्याची ताकद होती. आणि या विषाला नष्ट करण्याची क्षमता केवळ भगवान शिवांमधेच होती त्यामुळे त्यांनी हे हलाहल विष प्राशन करून ब्रम्हांडाला वाचवले.

पण विष प्राशन केल्यामुळे त्याचा कंठ निळा झाला व संपुर्ण देहाचा दाह होत होता. वैद्यांनी भगवान शिवांना संपुर्ण रात्र जागून काढण्याचा उपाय सांगितला. सर्व देवांनी भगवान शिवांना बरे वाटावे म्हणुन रात्रभर गायन आणि नृत्याची व्यवस्था केली. सकाळी महादेवांनी सर्वांना आशिर्वाद दिला. या संपुर्ण घटनाक्रमामुळे सृष्टी वाचली म्हणून या दिवसाला महाशिवरात्री असे म्हंटले जाते. अंगाच्या होत असलेल्या दाहामुळे भगवान शिवांनी या दिवशी तांडव नृत्य देखील केले होते. एका पौराणिक कथेनुसार, भगवान शंकर आणि पार्वती यांचा ज्या दिवशी विवाह झाला, तो दिवस म्हणजे महाशिवरात्रीचा दिवस, असे म्हटले जाते. तसेच या दिवसाबद्दल अजून एक कथा प्रचलित आहे. ती गोष्ट म्हणजे 'समुद्रमंथनाची' कथा. या कथेनुसार, महाशिवरात्रीच्या दिवशी शंकराने समुद्रमंथनातून निघालेले विष प्राषन करून सृष्टीचे रक्षण केले होते.

महाशिवरात्री या दिवशी भाविक संपुर्ण दिवस उपवास करतात. भगवान शिवांचे शिवलिलामृत, महारूद्र, भजन, गायन इत्यांदिचे आयोजन केले जाते. भगवान शिवाचे दर्शन घेउन त्यांचा कृपाप्रसाद मिळवण्याकरीता आराधना केली जाते. शिवाच्या मंदिरांमधे महाशिवरात्रीला मोठया संख्येने भाविकांची गर्दी दिसुन येते. बारा ज्योर्तिलिंग ज्या ज्या ठिकाणी आहे तेथे तर लाखोंच्या संख्येने भाविक महाशिवरात्रीला दर्शन घेण्याकरता जमा होतात. देशभरात बारा जोतिर्लिंगे आहेत. पैकी पाच महाराष्ट्रात आहेत. भगवान शिवाचे/महादेवाचे ज्या ज्या ठिकाणी मंदिर आहेत तेथे मोठया यात्रा भरतात. आपल्या महाराष्ट्रात त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर, भिमाशंकर, ही जोतिर्लिंगे व शिखर शिंगणापूर, ही प्रमुख स्थाने असून येथे मोठी मंदिर आहेत. शिवशंकराला १०८ बेलपत्रे वाहून शिवनामावली देखील म्हणतात.. महाशिवरात्रीला धोत्र्याचे फुल भगवान शंकराला वाहतात. शिवकृपा प्राप्त होण्यासाठी 'ओम

नमः शिवाय' हा जप जास्तीत जास्त करतात. तसेच रुद्राभिषेकाचेही महत्व आहे. भगवान शिवाला 'भोळा शंकर' देखील म्हंणतात. उपासना केल्यावर त्वरीत प्रसन्न होणारा आणि ईच्छित फळ देणारा हा महादेव सर्वांचे कल्याण करणारा असा आहे.

शिवपुराणात एक कथा सांगितली जाते ती अशी--

एक पारधी जंगलात शिकारी करता झाडावर बसला होता. संपुर्ण दिवस गेला परंतु त्याला शिकार मिळाली नाही. सायंकाळी हरणांचा एक कळप तेथे पाणी पिण्याकरता आला पारधी बाण सोडणार तेवढयात त्यातील एक हरीण पुढे येउन पारध्याला म्हणाला 'हे पारध्या तू आमची शिकार करणार हे माहित आहे परंतु मी तुला एक विनंती करतो, मला माझ्या कुटुंबाला एकदा भेटुन येऊ दे, माझी कर्तव्ये मला पार पाडुन येउ दे', हरणाने वचन दिल्याने पारध्याने त्यांची विनंती मान्य केली.

दुरवरून मंदिरातील घंटांचे आवाज येत होते ओम नमः शिवाय कानावर येत होते. पारधी ज्या झाडावर बसला होता ते झाड बेलाचे होते.

सहज चाळा म्हणून एक एक पान तो खाली टाकत होता त्या झाडाखाली असलेल्या शिवपिंडीवर ती बेलाची पानं पडत होती. नकळत का होईना त्या पारध्याच्या हातुन शिवाची उपासना घडली.

हरीण परत आल्यानंतर त्याने पारध्याला म्हंटले 'की आता मला मार मी माझे कुटूंब प्रमुख असल्याचे कर्तव्य बजावून आलो आहे तेंव्हा लगेच हरणी पुढे आली आणि तीने म्हंटले 'त्यांना नको मला मार मला माझे पत्नीधर्माचे कर्तव्य पार पाडायचे आहे'

त्वरीत हरणाची लहान पिल्लं पुढे आली आणि म्हणाली 'आईला नको आम्हाला मार आम्हाला आमचे पुत्रधर्माचे कर्तव्य पार पाडूदे'

ते पाहाता पारध्याच्या मनात विचार आला हे प्राणीमात्र असून देखील आपापल्या कर्तव्याला चुकत नाहीत तर मी माझा मानवधर्म, दयाधर्म का सोडू? त्याने सर्वांना सोडून दिले.

देवाधिदेव महादेव हे सर्व पाहून हरणावर आणि पारध्यावर प्रसन्न झाले आणि त्यांनी त्या सर्वांना कृपाआशिर्वाद दिला.

सर्वांचा उध्दार केला हरिणाला मृग नक्षत्र म्हणून व पारध्याला व्याघ्र नक्षत्र म्हणुन आकाशात नेहमीकरता स्थान दिले. हा प्रसंग ज्या दिवशी घडला तो दिवस होता महाशिवरात्रीचा . . . .अशी कथा आहे.

महाशिवरात्रीला शिवलिंगाची विशेष पूजा करतात.गाईचे दुध, तूप, शेण, गोमूत्र, दही अशा पंचगव्याने पूजा करतात. शिवलिंगाला अभिषेक करतात. धोत्रा, बेलाची पाने, पांढरी फुले वाहतात. पांढरे चंदन लावतात. दोन्ही सांज उपवास करतात. ओम नमःशिवाय जप, महामृत्युंजय मंत्र...

ॐत्र्यंबकं यजामहे सुगंधिम् पुष्टीवर्धनम्

उर्वारुकमिव बंधनान्मृत्योर्मुक्षीय मामृतात

सुर्योदय ते सूर्यास्त करतात.

चारही प्रहरात शिवाचे विशेष पूजन केले जाते.

हा दिवस योग परंपरेत महत्वाचा मानला जातो.मोठी संधी त्यांना असते महाशिवरात्रीला.

हा दिवस शिव-पार्वतीचे लग्नाचा वाढदिवस म्हणून ही साजरा करतात. तर शत्रुवर विजय मिळवला म्हणून साजरा करतात.

महाशिवरात्र तिथीची सुरुवात : १५ फेब्रुवारी २०२६ रोजी, रविवारी संध्याकाळी ०५ वाजून ०४ मिनिटांनी सुरू होईल.

महाशिवरात्र तिथीची समाप्ती : १६ फेब्रुवारी २०२६, सोमवार रोजी संध्याकाळी ०५ वाजून ३४ मिनिटांपर्यंत असेल. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीचे व्रत केले जाईल आणि १६ फेब्रवारी रोजी त्याचे पारण केले जाईल.

महाशिवरात्र जलाभिषेक शुभ मुहूर्त-

प्रथम प्रहर पूजा १५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ६ वाजून ११ मिनिटांपासून ते रात्री ९ वाजून २२ मिनिटांपर्यंत असेल.

द्वितीय प्रहर पूजा १५ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजून २३ मिनिटांपासून ते १६ फेब्रुवारी मध्यरात्री १२ वाजून ३४ मिनिटांपर्यंत असेल.

तृतीय प्रहर पूजा- १६ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजून ३५ मिनिटांपासून ते पहाटे ३ वाजून ४६ मिनिटांपर्यंत असेल.

चौथ्या प्रहराची पूजा- १६ फेब्रुवारी रोजी पहाटे ३ वाजून ४६ मिनिटांपासून ते सकाळी ६ वाजून ५९ मिनिटांपर्यंत असेल.

आपणही सर्वजण ''ॐ नमः शिवाय'' जप करुन शिवाचा कृपाशीर्वाद मिळवू या.

।। शिव हर शंकर नमामी शंकर,शिवशंकर शंभो.

हे गिरिजापती भवानी शंकर शिव शंकर शंभो.।।

# सूर्य मंदिर मोढेरा

**ज्योतिर्मय साहित्य**

गुजरात मधे मेहसाणा जिल्ह्यात पुष्पावती नदीच्या काठावर वसलेले मोढेराचे सूर्य मंदिर हे सोलंकी वंशाच्या राजा भीमदेव पहिला याने १०२६-२७ म्हणजेच १००० वर्षापूर्वी बांधलेले एक भव्य ऐतिहासिक आणि वास्तुकलेचा अद्भुत नमुना असलेले अप्रतिम मंदिर आहे. आता येथे कुठल्याही प्रकारची पूजा अथवा विधी होत नाहीत. फक्त एक प्रेक्षणीय स्थळ म्हणून पर्यटक आकर्षित होत असतात. हे मंदिर सूर्यदेवाला समर्पित असून, आपल्या सूर्यकुंडासह रामकुंड, ५२ कोरीव स्तंभ आणि अनोख्या स्थापत्यशास्त्रासाठी प्रसिद्ध आहे, जिथे सूर्यकिरणे थेट गर्भगृहात पडतात. मोढेरा सूर्य मंदिर गुजरातच्या अहमदाबाद पासून साधारण १०० किमी तर पाटणपासून दक्षिणेस सुमारे ३० किमी अंतरावर मोढेरा गावात आहे. हे मंदिर सोलंकी शैली किंवा चालुक्य शैली मध्ये बांधले गेले आहे.

मंदिर संकुलाचे तीन मुख्य भाग आहेत.

१) रामकुंड (सूर्यकुंड) : मंदिरासमोर असलेले भव्य आयताकृती तलाव, ज्यामध्ये १०८ लहान-मोठी मंदिरे आहेत .

*गिरीश खं. वसेकर (देशपांडे)*
*नांदेड सिटी,सिंहगड रोड*
*पुणे ९४२२६५९४००*

२) पुढे एक भव्य सभामंडप आहे. नृत्य किंवा सभांसाठी वापरला जाणारा हा मंडप, ५२ कोरीव खांबांवर उभा आहे, जे वर्षाच्या ५२ आठवड्यांना दर्शवतात.प्रत्येक खांबावर रामायण, महाभारत व कृष्ण जीवनावरील विविध प्रसंग सुंदर चित्रांनी रेखाटली आहेत.

३) तिसरा भाग म्हणजे तेथे एक गूढ मंडप अर्थात मुख्य गर्भगृह जिथे सूर्यदेवाची मुख्य मूर्ती असायची.

या मंदिराची रचना अशी आहे की, वर्षाच्या विशिष्ट दिवशी (२१ मार्च आणि २३ सप्टेंबर रोजी ) सूर्यकिरणे थेट गाभाऱ्यात प्रवेश करतात. असे म्हटले जाते की, एकेकाळी गर्भगृहात सोन्याच्या रथावर विराजमान सूर्यदेवाची मूर्ती होती, आणि त्यांच्या मुकुटावर एक मौल्यवान असा सुंदर हिरा होता. दरवर्षी जानेवारी महिन्यात, या मंदिरात उत्तरार्ध महोत्सव आयोजित केला जातो, तो भारतीय शास्त्रीय नृत्याचा एक अद्भुत सोहळा असतो. हे मंदिर भारतीय संस्कृती, विज्ञान आणि प्राचीन वास्तुकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे, जो पर्यटकांना नेहमीच आकर्षित करतो. येथे भारतातून पर्यटक तर येतातच पण परदेशी पर्यटक ही आकर्षित होत असतात.मागच्या डिसेंबर मध्ये आम्ही गुजरात मध्ये गेलो होतो ,तेंव्हा या मोढेरा या सूर्य मंदिराला भेट दिली, आणि हे मंदिर पाहून थक्क झालो. तेथे मंदिराची माहिती देण्यासाठीगाईड ही असतात. अतिशय अल्प दरात ते मंदिराबद्दल विस्तृत माहिती छान पद्धतीने सांगतात. मंदिरा जवळ विविध फळांची छोटी छोटी दुकाने गावातील लोकांनी थाटली आहेत. गोड अशी लाल पेरू,पपई, फणस आदी फळे तेथे मिळतात. तेथे येणारा पर्यटक या विविध फळांचा आनंद घेत असतातच. एकंदरीत गुजरात मधील मोढेरा सूर्य मंदिर एकदा तरी प्रत्येकाने पहावे असेच सुंदर आहे.

# साडी (दमलेल्या बाबाची )

**ज्योतिर्मय साहित्य**

(नेहमी महिलांवर लिहिते. पण पुरुष सुद्धा मूक होऊन दमलेला बाबा असतो. त्याची मूक वेदना स्त्रियांनी समजून घ्यावी )

पती जेव्हा साडी देतो तेव्हा भावना समजून घ्यायच्या असतात. पूर्वी एक दिवाळीची साडी मिळून स्त्रिया समाधानी असायच्या. तुटपुंज्या पगारातून सर्व कुटूंबाचा भार उचलून पती ने गजरा दिला, सोबत साडी दिली तर पत्नी ती वर्षानुवर्षे प्रेमाची आठवण म्हणून जपून ठेवायची. बाबानी दिलेली साडी म्हणत मुलांना, नातेवाईकांना कौतुकाने दाखवायची. किंमत फार नसली तरी त्यामागे पतीचा घाम, त्याचे कष्ट याची तिला कल्पना असायची. एक पण पुरे तुम्हाला हि नवीन घ्या करत पत्नी पतीला आहे त्यात समाधानी आहोत हे प्रत्येक कृतीतून दाखवायची. आज स्त्रिया डायमंड आणि सोन्याचे दागिने कितीही पती ने घेतले तरी समाधानी नसतात .कायम दुसरी च्या नशिबी गाडी, तर मलाही हि तेच हवे असे बाळबोध हट्ट करतात. , रांका, मलाबार पतीच्या फेऱ्या संपत नाहीत. कारण काही स्त्रियांना कितीही मिळाले तरी हाव, त्यांच्या हायफाय मैत्रिणींसमोर शायनिंग मारण्यातच धन्यता मानायची असते हि सवय लागलेली असते. वूई आर रिच हे जगाला दाखवायची हौस असते. हे सरकल मैत्रिणी करतानासुद्धा ब्रँडेड कपडे घालणारे नमुनेच निवडतात. सो सो किंवा मिडल क्लास याना एन्ट्री नसते. साडी पल्लोड, वामा इथूनच घेतली असे रंगवून आपली वेगळी कॅटेगरी आहे. हे च बोलत असतात. बौद्धिक किंवा अध्यत्मिकता शून्य परंतु फक्त छान राहणे, दिसणे, छान राहून प्रत्येक फंकशन अंबानी स्टाईल करून सोसिअल आहोत हा टेम्बा मिरवणे हि यांची जीवनपद्धती असते .हि लाईफ स्टाईल मेनटेन करताना कर्ज घेण्याची वेळ जरी पतीवर आली तरी त्या लाईफ स्टाईल नो कंप्रॉमिस.

हा अटीट्युड बाळगून हवेत तरंगतात. एक प्रश्न येतो साडी ५०००० ची असली तरी ती कपाटातच ठेवली जाते. ५०० ची असली तरी कपाटातच ठेवली जाते. प्रॅक्टिकली हि डेड इन्व्हेस्टमेंट नाही का ? तुम्ही रोज लाखाची साडी नेसू शकता का ?प्रत्येकजण आज महागाईने ग्रासलेला आहे .बऱ्याच लोकांची परिस्थिती इतकी

चांगली नसते किंवा विचार करण्याची पद्धत वेगळी असू शकते .ते इन्व्हेस्टमेंट म्हणून दुसऱ्या ठिकाणी पैसे गुंतवून स्वतःचा भविष्यकाळ सुखकर जाईल अशी तरतूद करत असतात .मग दुसऱ्या महिलेच्या साडीवर बोचक विधाने किंवा टीका हा अतिशहाणा महिला वर्ग करत राहतो. चॉईस बेकार ,चीप वगैरे लेबल लावून आपल्या साड्या आकाशातून टपकत असतात वैगेरे स्वकौतुक स्वतःच करून स्वतःच हार तुरे स्वतःलाच वाहून घेत असतात. साडीवरून, बाह्य वेषभूषेवरून मनुष्य पारखत असाल तर मुळातच हे नीतिमूल्यं नसलेल्याची ओळख असते .लग्नात नेमका याच स्त्रीच्या विचारसरणीचा उपयोग मोठे मोठे दुकाने करून घेतात .भव्य शोरूमचा पूर्ण पैसे साडीच्या अवाढव्य किमतीत वसूल केला जातो. दिवाळी हि लग्नातच साजरी होते कारण मानपान, लग्नातील बस्ता यातच सर्वसामान्य कुटूंबातील मुलीच्या वडिलांची दयनीय अवस्था होते. पै पै ने जोडलेला बँक बॅलन्स दहा मिनटात रिकामा होतो. आता लेहेंगे, प्रिवेडींग, लग्न, एंगेजमेंट, बर्थडे हे कार्यक्रम नाही इव्हेंट झाले आहेत. सर्वाना शो ऑफ करून कार्य पार पडले पाहिजे हीच वृत्ती वाढीस लागली आहे .लोक तोंडावर कौतुक करतात पण तुमच्याकडे पैसे कमी आहेत अशी परिस्थिती निर्माण झाली तर ते पहिले पाठ फिरवतात .त्यांच्या कार्यांना देखील ते तुम्हाला पद्धतशीरपणे वगळतात .एकच सांगणे महिला वर्गास या सर्व मोह, हव्यास यांना किती महत्व देयचे ?कोणी काहीही म्हणले तरी ते सारासार विचार बुद्धी त बसणारे आहे का ? ही परिपक्वता आणावी. आपला वृद्धपकाळ, लाईफ इन्शुरन्स, आपली भविष्यासाठी तरतूद हि जास्त महत्वाची नाही का ? आज पैसे असतील तरच म्हातारपण केअर टेकर लावून सुखकर जाऊ शकते .मानाने रहायचे असेल तर उधळ्या स्वभावाला आवर घालणे महत्वाचे. तुम्ही ५०० रुपयात सुखी असाल तर तुमची मुले तेच शिकतील. गोष्ट एका साडीची नाही पण एकेक वस्तूच्या किमतीची आहे. संघर्ष करून मोठी झालेली आई मुलांना शिस्त लावेल कि संघर्ष करून वस्तूंचे जतन करा. आणि हेच करायला हवे कि तुम्ही कमवा मग पैशाचे मोल जाणा. आवश्यक गोष्टी आणि विनाकारण उधळपट्टी यातला फरक आईला साडीतून कळला कि पुढच्या पिढीला कळतो. लक्ष्मी चंचल असते. आज सुखवस्तू असाल तर उद्या ही तसेच असेल याचा भरवसा नाही. गरिबीतून वाढलेली मुले सहसा माज करत नाहीत. आहे म्हणून उडवा ह्या आचरणामुळे मुले अगदी स्त्रियासुद्धा पार्टीस, ड्रिंक्स हीच जीवनाची आचरण शैली मानू लागले आहेत. सहज नजर टाकली तरी सर्व मिळूनही प्रत्येक स्तरावर असमाधानी वृत्तीने ग्रासलेली जनता कमालीची नकारात्मकता समाजात पसरवत आहे. शुन्यातून सुरुवात आणि शून्यात शेवट हा नशिबाचा खेळ ज्यांच्या वाटेला येतो. तो खचतो. कधी आत्महत्या करतो. नेहमीच स्त्री बद्दल लिहिते पण पुरुष सुद्धा आतून एक लढाई लढत असतो. स्त्रीला रडता येते. पुरुष आतून ढासळत असतो. आता दोघेही काम करतात पण पूर्वी स्त्री घरात राबवली जात असे. समाधान टिकवून ठेवायचे असेल तर दोघांनी एकमेकांना समजून घेतले पाहिजे .वायफळ खर्च, दारू यात किती वाहवत जायचे ठरवले पाहिजे. तरीही आज त्या स्त्रियांसाठी लेख आहे ज्या पती ला समजूनच घेत नाहीत. हेकेखोर पणाने वागून नमते घेतच नाहीत. साडीचे धागे प्रेमाचे असतात. एकदा म्हणून बघा. आणली त्याच्यातही आनंद आहे. आहे त्यात सुखी राहू. दमलेला बाबा थोडा तृप्त होईल. आपण पत्नी, लेकरांना सुखी ठेवू शकलो हीच पोचपावती त्याला जगण्याचे बळ देईल. एक पिढी एका साडीवरून नीतिमूल्यांची गुंतवणूक शिकेल पण त्यासाठी तुम्हाला साडी किती महाग न बघता ,प्रेमाने दिली यात समाधान शिकावे लागेल .

सौ. माधुरी पळणिटकर,
सातारा. मो. 9921495533

सगळ्यात मूल्यवान तरी आईची साडी असते. मी तिचा घाम पुसत म्हणायचे, अशी कशी ग गरीब, समाधानी कधी बाबांकडे हट्टच करत नाही. मला दागिना हवाय. मला साडी हवी ही वाक्ये माझ्या घरात मी ऐकलीच नाही कधी. या दिवाळीला

मला नवीन नको पण आईला साडी घ्या. म्हणल्यावर माझे बाबा म्हणायचे लहानच रहा. इतकी मोठी होऊ नकोस. परिस्थिती समजूतदार बनवते.

आईला भेटायला गेल्यावर साडी मात्र नेतेच नेते. ती आता बास ग किती कपाटात पडल्या म्हणते.

मी मात्र बाबा बघत आहेत का ? म्हणून आभाळाकडे बघते.

तिला मिठी मारते. मायेचे धागे तिला माझी आठवण देतील म्हणून तिला ती नेसायलाच लावते.

***

# भारत मलेशिया संयुक्त भागीदारीचे नवे महापर्व

## व्यापार आणि गुंतवणूक तसेच डिजिटल प्रणाली व आर्थिक सहकार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

मलेशियाला प्राचीन काळात सुवर्णभूमी म्हटले जात असे. मलेशियामध्ये श्री विजय घराण्याने राज्य करून येथे हिंदू कला व स्थापत्याचा प्रसार केला. पंधराव्या शतकाच्या प्रारंभी परमेश्वर हा राजा इष्कंदर शाह बनला आणि मलेशियावर इस्लामचा पगडा वाढू लागला, परंतु तरी देखील मलेशियातील लोकांनी आपली स्थानिक संस्कृती भारतीय संस्कृती आणि नंतर पडलेल्या सर्व प्रभावांचा स्वीकार करून आपले बहुसंस्कृतिक उदार व सहिष्णू व्यक्तिमत्व जोपासले आहे. त्यामुळे विविधतेतील एकता हा दोन्ही देशांतील एक समान धागा आहे. किंबहुना भारत मलेशिया मैत्रीचा तो आत्मा आहे. पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांनी हा आत्मा यथार्थपणे जोपासला आहे. त्यामुळे भारत मलेशिया मैत्री एका उंचीवर पोहोचली आहे.

मलेशियाच्या आखाताशिवाय खंबायत राहू शकत नाही आणि खंबायतच्या आखाता शिवाय मलेशिया राहू शकत नाही, या ऐतिहासिक सत्याची प्रचिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मलेशिया दौऱ्यामुळे आली. प्राचीन काळी एक मसाल्याची पिशवी सोन्याच्या पिशवी एवढी मानली जात असे. त्यामुळे ३००० वर्षापासून भारत आणि मलेशिया यांच्यातील सागरी संबंध हे सांस्कृतिक आर्थिक आणि राजकीय पातळीवर सातत्याने नवे रूप घेत होते. सबंध अग्नेय आशियातील या सांस्कृतिक प्रक्रियेचे वर्णन कोडेस या फ्रेंच पुरातत्त्वज्ञाने भारतीय करण असे केले होते. या सत्याची पुन्हा एकदा प्रचिती भारत मलेशिया ऐतिहासिक मैत्रीच्या अभ्युदयाने आली आहे. भारताच्या व्हिजन महासागर तसेच हिंद प्रशांत क्षेत्रातील शांतता प्रगती व स्थैर्याची हाक या धोरणाचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून भारत मलेशिया मैत्रीकडे पाहिले पाहिजे.

वृत्त भारताची प्रतिष्ठा

भारत मलेशिया ऐतिहासिक मैत्री ही उभय राष्ट्रातील सांस्कृतिक संबंधांची वेळ भक्कम करणारी आहे प्राचीन काळात कौंडिण्य ऋषींनी मलेशियाच्या सुवर्णभूमीत पहिले पाऊल ठेवले आणि तेथील राजकन्याशी विवाह केला तेव्हापासून भारत मलेशिया यांच्या सातत्यपूर्ण मैत्रीला प्रारंभ झाला. आज मलेशियामध्ये २.९ लाख भारतीय राहतात तसेच दोन्ही देशांमध्ये पर्यटकांची संख्या लाखोंनी वाढत आहे. भारताच्या वाढत्या प्रभुत्वा बरोबर मलेशियालाही त्याचा अभिमान वाटणे साहजिक आहे.

लोकप्रियतेच्या शिखरावर

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मलेशिया लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत, तेथील अनिवासी भारतीयांनी त्यांच्या स्वागतासाठी ८०० निवडक नर्तिकांनी स्वागतम शुभ स्वागतम हे गीत भारतीय नृत्य ओडिसी भरतनाट्यम इत्यादीच्या रूपाने सादर केले. मलेशियात भारतीय चित्रपटांची लोकप्रियता तसेच तमिळ भाषेचा वाढता प्रभाव आणि भारतीय माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा दबदबा व त्यातून होत असलेली रोजगार निर्मिती यामुळे भारत मलेशिया संबंधाला आता नवी आर्थिक बैठक प्राप्त झाली आहे. आणि उभय देशातील व्यापार हा २० अमेरिकन डॉलर पर्यंत पोहोचला आहे आणि पुढे तो नव्या दिशेने आगे कूच करत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अनिवासी भारतीयांसमोर केलेले स्फूर्तीदायक भाषण म्हणजे दोन्ही देशातील ऐतिहासिक, सांस्कृतिक, आर्थिक संबंधांना नवा उजाळा देणारे ठरले या भाषणामध्ये त्यांनी समान सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या दोन्ही देशांनी आता उज्वल भविष्याच्या आणि समृद्ध स्वयंपूर्ण राष्ट्रांच्या उभारणीसाठी करावयाच्या प्रयत्नांचा आढावा घेतला अत्यंत उत्स्फूर्तपणे अनिवासी भारतीयांनी मोदी मोदी चा घोष करून त्यांचे स्वागत केले त्यातच त्यांच्या लोकप्रियतेची पावती दिसून आली

प्रमुख सामंजस्य करार

भारत आणि मलेशिया दरम्यान संमत झालेले ११ सामंजस्य करार हे दोन्ही देशातील परस्पर पूरक सहकार्याची पावती देणारे आहेत अशा प्रमुख करारामध्ये प्रामुख्याने समान राजकीय दृष्टिकोनाबरोबरच डिजिटल प्रणाली व आर्थिक सहकार्य तसेच ऊर्जा आणि सेमीकंडक्टर क्षेत्रातील अदान प्रदान संरक्षण आणि सुरक्षा भागीदारी शिक्षण आणि कौशल्य

विकास संस्कृती पर्यटन आणि लोक लोक संपर्क आरोग्य सेवा क्षेत्रातील सहकार्य शाश्वत विकास क्षेत्रातील नवे प्रयोग प्रादेशिक व बहुपक्षीय सहकार्य अशा प्रमुख घटकांचा समावेश आहे

प्रमुख फलश्रुती कोणत्या

उभय देशातील असलेले स्नेहसंबंध आता नव्या करारामुळे अधिक भक्कम झाले आहेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मलेशिया भेटीतील प्रमुख फलश्रुती काय असेल तर ती म्हणजे सेमीकंडक्टर क्षेत्रातील धाडसी पाऊल होय. मलेशियाचा याबाबतीतला पूर्वानुभव भारताला पथदर्शक ठरणार आहे, शिवाय संरक्षण आणि सुरक्षा क्षेत्रातील नियमित लष्करी सराव हवाई व नौदल प्रशिक्षणे याबरोबरच संरक्षण उत्पादनातील करार हे उभयतांना हितवर्धक ठरले आहेत. भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने ४७ कलमी घोषणापत्र जाहीर केले आहे त्यातील ठळक तरतुदीचा पुढे परामर्श घेतला आहे.

आर्थिक व तांत्रिक सहकार्य

पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी आणि सेमी कंडक्टर क्षेत्रात संयुक्त संशोधन करण्यासाठी दोन्ही देशांनी संयुक्त संशोधनासाठी परस्पर आदान प्रदान करण्यासाठी विशेष करार केला आहे या देवाण घेवाणीमुळे दोन्ही देशांना या क्षेत्रात दमदार वाटचाल करता येईल. डिजिटल पेमेंट प्रणाली ही एक मोठी उपलब्धी आहे. भारताच्या एनआयपीएल इंटरनॅशनल यंत्रणा आणि मलेशियाच्या पे नेट या संस्थेने यूपीआय आधारित क्रॉस बॉर्डर पेमेंटसाठी एक नवा करार केला आहे. त्यामुळे पर्यटक आणि प्रवाशांना पेमेंट करणे सोपे जाईल. वाढत्या पर्यटनाला गती देण्यासाठी हा करार महत्त्वाचा आहे तसेच स्थानिक चलनाचा वापर ही सुद्धा एक नवी उपलब्धी आहे, दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनी द्विपक्षीय व्यापार आणि गुंतवणुकीसाठी भारतीय रुपयांमध्ये आणि मलेशियन रंगीत चलनाचा वापर करण्यास प्रोत्साहन देण्याचे ठरविले आहे या सर्व करारामुळे दोन्ही देशातील व्यापार पर्यटन याला निश्चितच गती लाभेल.

संरक्षण आणि सुरक्षा

संरक्षण आणि सुरक्षा क्षेत्रातील सहकार्य दोन्ही देशांचे सामर्थ्य वाढविण्यासाठी पोषक ठरणार आहे विशेषतः दहशतवादाविरुद्ध लढा देण्यासाठी दोन्ही देशांनी स्पष्ट केले आहे की दहशतवादाविरुद्ध ० सहिष्णुता असली पाहिजे या प्रश्नावर कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही तसेच या प्रश्न दुटप्पी भूमिका ही घेता कामा नये असे पंतप्रधान मोदी यांनी निक्षून सांगितले आहे व ते मलेशियाने मान्य केले आहे. संरक्षण क्षेत्रात संभाव्य धोक्यांना तोंड देण्यासाठी दोन्ही देश समान भूमिका घेऊन प्रशिक्षणाच्या आधारे आपल्या तीनही दलांचे संयुक्त संचलन करत आहेत, करत राहतील. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा क्षेत्रामध्ये एक नवे पर्व सुरू होत आहे शिवाय संयुक्त राष्ट्र संघाच्या शांतता अभियानात दोन्ही देशांचा सहभाग महत्त्वाचा आहे. संयुक्त राष्ट्र शांतता अभियान सहकार्याचे नूतनीकरण करण्यासाठी प्रस्तावाची देवाणघेवाण करण्यात आली आहे

शिक्षण आणि सांस्कृतिक सहकार्य

शिक्षण आणि सांस्कृतिक सहकार्य हा या सर्व करारांचा प्रमुख आत्मा आहे. मलेशियातील तामिळ संस्कृतीचा वाढता प्रभाव लक्षात घेऊन पंतप्रधानाने

तिरवल्लूवर संशोधन केंद्र आणि शिष्यवृत्ती योजना घोषित केली तेथील मला या विद्यापीठात एक विशेष संशोधन केंद्र तमिळ महाकवी च्या नावाने सुरू करण्याची घोषणा ही अत्यंत महत्त्वाची असून त्यामुळे मला या विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी ठरेल तसेच त्यांच्या तमिळ शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरू करण्याचा निर्णय सुद्धा स्वागत आहे. पंतप्रधानांनी मलेशियामध्ये नवीन वाणिज्य दूतावास स्थापन करण्याची घोषणा केली आहे. अनिवासी भारतीय आणि डायस्पोरा यांना आर्थिक सेवा देण्यासाठी असे आणखी एक नवीन वाणिज्य दूतावास स्थापन करण्याचा निर्णय स्वागत आहे. भारताच्या नवरंगी अर्थव्यवस्थेचे सामर्थ्य लक्षात घेऊन दोन्ही देश दृकश्राव्य कलाकृती निर्माण करण्यासाठी करारबद्ध झाले आहेत. चित्रपट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या क्षेत्रात संयुक्त निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी एक व्यापक करार करण्यात आला आहे त्यामुळे दोन्ही देशातील सर्जनशील कलावंतांना मोठ्या संधी मिळतील.

प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर
मोबाईल नं. 9225313592
ई-1108, कल्पतरू,
ग्लोरिया ग्रेस,
बावधन, पुणे

समारोप

आजवरच्या भारत मलेशिया संबंधांना एका नव्या उंचीवर नेण्याचे कार्य पंतप्रधान मोदी यांच्या मलेशिया दौऱ्यामुळे साध्य झाले आहे. तसेच सामाजिक सुरक्षा या क्षेत्रात सुद्धा महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे. मलेशिया मध्ये काम करणाऱ्या भारतीय कामगारांच्या लाभासाठी भारताच्या इएसआयसी आणि मलेशियाच्या पैकी सोपे किशोर या यंत्रणेमध्ये एक करार झाला आहे या करारामुळे त्यांना चांगली सुरक्षा प्राप्त होऊ शकेल आपत्ती व्यवस्थापन हे सुद्धा असेच एक उपेक्षित अंग या कराराने भक्कम मदतीचा हात देणारे ठरले आहे. संकट काळात परस्पर सहकार्यासाठी एक सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यामुळे कुठल्याही आपत्ती प्रसंगी दोन्ही देश एकमेकांच्या सुखदुःखात सामील होऊ शकतात आरोग्य आणि आयुर्वेद या क्षेत्रामध्ये सुद्धा दोन्ही देशांचे भक्कम सहकार्य अपेक्षित आहे पारंपरिक औषध प्रणाली आणि आरोग्यसेवा या क्षेत्रामध्ये संशोधनाला गती देण्यासाठी एक नवा करार करण्यात आला आहे या कराराचे अंतिम स्वरूप आयुर्वेद मंत्रालयाने साकार केले आहे क्षेत्र कुठलेही असो सुरक्षा असो की संरक्षणाचे ऊर्जा असो की सेमीकंडक्टर असो किंवा शिक्षण संस्कृती व पर्यटनाचे क्षेत्र असो या सर्व बाबतीत दोन्ही देशाने घेतलेला पुढाकार महत्त्वाचा आहे. आणि नजिकच्या भविष्यकाळात आशियातील वाघ आणि सिंह हे एकत्र गर्जना करू शकतील आणि या गरजेनेतून अशियन टायगरचे पर्व वाढेल आणि आशियाचा हा बुलंद आवाज अनेक देशांची झोप उडवून टाकणारा ठरेल. मलेशियामुळे या कराराला आणि या नव्या महापरवाला प्रारंभ झाला आहे असे म्हणावे लागेल भारत मलेशिया संयुक्त भागीदारीचे हे नवे महापर्व खरोखरच इतिहासावर विलक्षण ठसा उमटवणारे ठराविक अशी अपेक्षा आहे एकीकडे दहशतवादाचे उच्चाटन आणि दुसरीकडे भ्रष्टाचार समूळ नष्ट करण्यासाठी सुद्धा वय राष्ट्रातील सर्वोच्च संस्थांनी सामंजस्य करार केला आहे मलेशिया हा आशियान परिषदेचा अध्यक्ष होता आणि या कार्यकाळात मलेशियाने केलेल्या कार्याचे आणि भरीव योगदानाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मलेशियाचे पंतप्रधान श्री अन्वर इब्राहिम यांची वैयक्तिक मैत्री ही सुद्धा उभय राष्ट्रातील संबंधांना नव्या उंचीवर घेऊन जाणारी ठरली आहे. ज्या पद्धतीने नरेंद्र भाई मोदी शेजारी राष्ट्रातील प्रमुखांचे मन जिंकतात आणि त्यांच्या हृदयात आपले स्थान निर्माण करतात ती त्यांची शैली खरोखरच स्पृहणीय आहे भारत मलेशिया संबंधातील त्यामुळे हा सुवर्णकाळ म्हटला पाहिजे.

# महाशिवरात्री: आध्यात्मिक प्रकाश आणि वैज्ञानिक सत्य

**ज्योतिर्मय साहित्य**

**(मागील अंकावरून)**

आध्यात्मिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन हे एकाच सत्याकडे पाहण्याचे दोन वेगवेगळे मार्ग आहेत. विज्ञान प्रयोग, निरीक्षण आणि पुराव्यांवर आधारलेले असून ते 'कसे?' हा प्रश्न विचारतेसृष्टी कशी निर्माण झाली, पाऊस कसा पडतो, अणू कसा कार्य करतो? अध्यात्म 'का?' हा प्रश्न विचारतेजीवनाचा उद्देश काय, आपण कोण आहोत, चेतनेचे स्वरूप काय? विज्ञान बाह्य जगाचा, पदार्थाचा आणि निसर्गनियमांचा अभ्यास करते; अध्यात्म मन, जाणीव आणि आत्म्याचा शोध घेते. विज्ञानात नियम नवीन संशोधनानुसार बदलतात, तर अध्यात्मात सत्य शाश्वत मानले जाते. तरीही आधुनिक काळात विज्ञान आणि अध्यात्म यांच्यातील दरी कमी होताना दिसते. क्वांटम फिजिक्सने पदार्थ हा ऊर्जेचेच एक रूप आहे, हे मान्य केले आहेजे तत्त्वज्ञान प्राचीन भारतीय परंपरेत पूर्वीपासून सांगितले गेले आहे. ध्यानामुळे मेंदूतील अल्फा लहरी वाढतात, तणाव कमी होतो आणि लिंबिक प्रणाली शांत होते, असे संशोधनातून आढळले आहे. त्यामुळे अध्यात्मिक साधना आणि आधुनिक विज्ञान यांच्यातील संवाद अधिक दृढ होत आहे. ऊर्जा आणि पदार्थाच्या नात्याचे स्पष्टीकरण देणारे आइनस्टाइनचे प्रसिद्ध समीकरण ऊर्जा () = वस्तुमान () प्रकाशाच्या वेगाचा वर्ग () = सांगते की ऊर्जा आणि पदार्थ हे एकाच वास्तवाच्या दोन बाजू आहेत. अध्यात्मात शिव हे स्थिर, शुद्ध जाणीव मानले जातात, तर शक्ती ही गतिशील ऊर्जा आहे. शक्तीशिवाय शिव 'शव' आहेत आणि शिवाशिवाय शक्ती अनियंत्रित आहेही संकल्पना विज्ञानातील मास-एनर्जी समतुल्यतेशी साधर्म्य दाखवते. क्वांटम फील्ड थिअरीनुसार अणूतील कण सतत कंपन करत असतात; या 'सबॲटॉमिक डान्स'ची तुलना शिवाच्या तांडवाशी केली जाते. सुप्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ फ्रीटजोफ काप्रा यांनी त्यांच्या 'द ताओ ऑफ फिजिक्स' (' ') या पुस्तकात शिवनटराजाच्या नृत्याची तुलना अणुकणांच्या या नृत्याशी केली आहे. जिनिव्हा येथील 'युरोपियन ऑर्गनायझेशन फॉर न्यूक्लिअर रिसर्च' या जगप्रसिद्ध कणभौतिकी प्रयोगशाळेबाहेर १८ जून २००४ रोजी भारत सरकारने नटराजाची मूर्ती भेट म्हणून स्थापित केली. त्या मूर्तीखाली काप्रा यांचे विधान कोरलेले आहे, ज्यात आधुनिक भौतिकशास्त्र आणि शिवाच्या नृत्याचा संबंध स्पष्ट केला आहे. नटराजाच्या मूर्तीतील प्रत्येक घटक अत्यंत सूक्ष्म तत्त्वज्ञान मांडतो. शिवाच्या हातातील डमरू हे प्रथम कंपनाचे आणि सृष्टीच्या आरंभी झालेल्या आदिनादाचे प्रतीक आहे. अध्यात्मानुसार विश्वाची सुरुवात 'नाद' किंवा कंपनातून झाली असे मानले जाते. डमरूचा आवाज म्हणजे त्या पहिल्या स्पंदनाची आठवणज्याप्रमाणे बिग बँग सिद्धांत विश्वाच्या विस्ताराची सुरुवात एका कंपनातून झाल्याचे सांगतो, त्याचप्रमाणे डमरू सर्जनाच्या आरंभीच्या ऊर्जा-तरंगांचे प्रतीक मानला जातो. शिवाच्या दुसऱ्या हातातील अग्नी हा रूपांतरणाचा आणि लयाचा द्योतक आहे. विनाश म्हणजे केवळ समाप्ती नव्हे, तर नव्या निर्मितीची पूर्वतयारी आहे. जसे अग्नी जुन्या वस्तू जाळून राख करतो आणि त्या राखेतून नवजीवन अंकुरते, तसेच शिवाचा अग्नी अहंकार, अज्ञान आणि नकारात्मकता जाळून आत्मजागृतीस मार्ग मोकळा करतो. शिवाची अभयमुद्राउंचावलेला करभयमुक्ती, संरक्षण आणि करुणेचे प्रतीक आहे. ती भक्ताला आश्वासन देते की विश्वातील परिवर्तन, लय आणि आव्हानांच्या मध्यातही दिव्य शक्तीचे संरक्षण सदैव सोबत आहे. या मुद्रेतून ''भीऊ नकोस'' असा संदेश दिला जातो. शिवाच्या पायाखाली असलेला अपस्मार हा अज्ञान, अहंकार आणि मर्यादित चेतनेचे प्रतीक आहे. शिव त्यावर पाय ठेवून उभे आहेत, याचा अर्थ ज्ञानाने अज्ञानावर विजय मिळवणे. मनातील भ्रम, मोह आणि अंधकार दडपल्याशिवाय आत्मप्रकाश प्रकट होत नाही. अशा प्रकारे नटराजाच्या रूपात सृष्टीची निर्मिती (डमरू), रूपांतरण (अग्नी), संरक्षण (अभयमुद्रा) आणि अज्ञानाचा नाश (अपस्मार) हे चार मूलभूत तत्त्व एकाच वेळी प्रकट होतात. हे रूप केवळ धार्मिक प्रतिमा नसून संपूर्ण विश्वचक्राचे तत्त्वज्ञानात्मक दर्शन आहे.

बिग बँग सिद्धांतानुसार सुमारे १३.८ अब्ज वर्षांपूर्वी संपूर्ण विश्व एका सूक्ष्म, अत्यंत घन आणि उष्ण बिंदूतसिंग्युलॅरिटीमध्येएकवटलेले होते आणि त्यातून अवकाशाचा वेगाने विस्तार झाला. अध्यात्मात हेच शिवाचे 'शून्य' रूप मानले जाते, जिथून शक्ती प्रकट होऊन सृष्टीची निर्मिती झाली. शक्ती ही त्या प्रथम ऊर्जा-स्फोटाची प्रतीकात्मक अभिव्यक्ती आहे. विश्वाच्या अंताबाबत 'बिग क्रंच' किंवा 'ऑसिलेटिंग युनिव्हर्स' सिद्धांत मांडले गेले आहेत, ज्यात विश्व पुन्हा आकुंचन पावून शून्यात विलीन होऊ शकते. अध्यात्मात यालाच 'महाप्रलय' म्हटले जातेनिर्मिती आणि लय यांचे अखंड चक्र. ब्लॅक होलची संकल्पना देखील शिवतत्त्वाशी जोडली जाते. ब्लॅक होलमध्ये गुरुत्वाकर्षण इतके प्रबळ असते की प्रकाशही बाहेर पडू शकत नाही. त्याच्या मध्यभागी असलेली सिंग्युलॅरिटी आकारमानाने शून्य आणि घनतेने अनंत असतेहे शिवलिंगाच्या अनंत ऊर्जेच्या स्तंभाशी तुलना केले जाते. इव्हेंट होरायझन ही दृश्य आणि अदृश्य जगातील सीमा दर्शवते. स्टीफन हॉकिंग यांनी मांडलेल्या

'हॉकिंग रेडिएशन'नुसार ब्लॅक होल केवळ गिळंकृत करत नाहीत, तर ऊर्जा उत्सर्जितही करतातजसे शिवाचा विनाश नवीन निर्मितीची बीजे पेरतो. शिव, शक्ती आणि विष्णू यांचे एकत्व हे वैश्विक प्रक्रियांचे सुंदर तत्त्वज्ञान आहे. ब्रह्मा निर्मितीचे, विष्णू पालनाचे आणि शिव लयाचे प्रतीक आहेत; शक्ती ही या तिन्ही प्रक्रियांना चालना देणारी ऊर्जा आहे. विज्ञानातील 'लॉ ऑफ कन्झर्वेशन ऑफ एनर्जी' सांगतो की ऊर्जा निर्माण किंवा नष्ट होत नाही, ती फक्त रूप बदलतेहेच तत्त्व शिव-विष्णू-शक्ती एकत्वात प्रतिबिंबित होते. 'हरि-हर' संकल्पना दर्शवते की पालन आणि परिवर्तन हे वेगळे नसून एकाच प्रक्रियेचे दोन पैलू आहेत. एंट्रॉपी () म्हणजे अव्यवस्था वाढण्याची प्रक्रिया; शिव परिवर्तनाचे प्रतीक आहेत, तर विष्णू सुव्यवस्था टिकवण्याचे. दोघांमध्ये संतुलन असल्यामुळेच विश्व गतिमान आणि स्थिर दोन्ही राहते. अर्धनारीनटेश्वर हे जाणीव आणि ऊर्जा, पुरुष आणि प्रकृती, तर्क आणि सृजनशीलता यांच्या समन्वयाचे प्रतीक आहे. जैविक दृष्टिकोनातून पाहिले तर प्रत्येक व्यक्तीमध्ये स्त्री आणि पुरुष या दोन्हींचा सूक्ष्म अंश गुणसूत्रांच्या रूपाने आढळतो, तसेच मेंदूचे डावे अर्धगोल तर्क आणि विश्लेषणाशी संबंधित असते तर उजवे अर्धगोल भावना व सृजनशीलतेशी निगडित असते. यावरून निसर्गात दिसणारे द्वैत प्रत्यक्षात एकमेकांपासून वेगळे नसून परस्परपूरक आहे, हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे क्वांटम फिजिक्समधील वेव्ह-पार्टिकल ड्युॲलिटी दर्शवते की प्रकाश किंवा कण हे एकाच वेळी लहरी आणि कण दोन्ही स्वरूपात वागू शकतात. हेच तत्त्व अध्यात्मात शिव (स्थिर कण) आणि शक्ती (गतिमान लहरी) यांच्या एकत्वाचे प्रतीक म्हणून समजले जाऊ शकते.

'ॐ' हा स्वरादी नाद मानला जातोम्हणजेच सृष्टीच्या प्रारंभी प्रकट झालेला मूलध्वनी. भारतीय तत्त्वज्ञानानुसार विश्वाची निर्मिती 'नाद'तून झाली आणि तो आदिनाद म्हणजेच 'ॐ'. 'अ', 'उ' आणि 'म' या तीन ध्वनींच्या एकत्रिकरणातून निर्माण होणारी स्पंदने केवळ उच्चारापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण शरीरात सूक्ष्म कंपन निर्माण करतात. 'अ' हा ध्वनी नाभीपासून उगम पावतो, 'उ' छाती व घशातून प्रवाहित होतो, तर 'म' हा अनुनासिक स्पंदन डोक्याच्या मध्यभागी अनुभवला जातो. या तिन्हींच्या संयोगातून शरीरातील ऊर्जा केंद्रे जागृत होतात, असे योगशास्त्र सांगते. काही वैज्ञानिक अभ्यासांनुसार 'ॐ'चा जप केल्याने मेंदूतील अल्फा लहरी वाढतात, ज्यामुळे मन अधिक शांत व स्थिर होते आणि तणावाची पातळी कमी होते. मेंदूच्या मध्यभागी असलेली पाइनियल ग्रंथीजिला प्रतीकात्मकरीत्या 'तिसरा डोळा' म्हटले जातेही मेलाटोनिन संप्रेरक स्रवून झोप-जागृती चक्र नियंत्रित करते. ध्यान आणि मंत्रजपामुळे या ग्रंथीची क्रिया संतुलित होत असल्याचे काही संशोधनातून दिसून आले आहे. त्यामुळे अंतर्ज्ञान, एकाग्रता आणि मानसिक स्पष्टता वाढते, असे अनुभवले जाते. योगपरंपरेनुसार पाठीचा कणा ताठ ठेवून साधना केल्यास सेरेब्रोस्पाइनल द्रवाचे वहन संतुलित राहते आणि मेंदू व मज्जासंस्थेवर सकारात्मक परिणाम होतो. यालाच 'कुंडलिनी जागृती'चे प्रतीकात्मक वर्णन मानले जातेम्हणजे शरीरातील सुप्त ऊर्जा उर्ध्वगामी होऊन सहस्रारापर्यंत पोहोचते. शिवाच्या डमरूचा नाद हा या आदिनादाचेच प्रतीक मानला जातो. शिव म्हणजे शांत, निराकार चेतना; तर 'ॐ' हा त्या चेतनेचा स्पंदनरूप अभिव्यक्ती. म्हणूनच 'ॐ नमः शिवाय' हा मंत्र उच्चारताना साधक स्वतःतील ऊर्जा आणि शिवतत्त्व यांचे एकत्व अनुभवण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे 'ॐ' हा केवळ ध्वनी नसून तो सृष्टीचा मूलनाद, शिवाची चेतना आणि मानवाच्या अंतर्मनाला जागृत करणारी आध्यात्मिक किल्ली मानली जाते

पंचमहाभूतांची संकल्पनापृथ्वी, आप, अग्नी, वायु आणि आकाशही आधुनिक विज्ञानातील पदार्थाच्या अवस्था आणि ऊर्जेच्या रूपांशी तुलना केली जाते. पृथ्वी म्हणजे स्थैर्य (घन अवस्था), आप म्हणजे प्रवाहीपणा (द्रव), वायु म्हणजे हालचाल (वायू), अग्नी म्हणजे ऊर्जा व उष्णता (प्लाझ्मा), आणि आकाश म्हणजे अवकाश किंवा क्वांटम फील्ड. या सर्वांना गतिमान ठेवणारी मूळ प्रेरणा म्हणजे शक्ती. शरीरातील संतुलन या तत्त्वांवर अवलंबून असतेचयापचयातील अग्नी, श्वसनातील वायु, रक्तातील जल, हाडांतील पृथ्वी आणि सर्वांना व्यापणारे आकाश. गणितातील 'शून्य' आणि 'अनंत' ही संकल्पना देखील शिवतत्त्वाशी निगडित आहे. शून्याला स्वतःचे मूल्य नसले तरी ते इतर अंकांसोबत जोडल्यास त्यांचे मूल्य वाढते; त्याचप्रमाणे शून्यावस्थेतूनच अनंत शक्यता जन्म घेतात. क्वांटम व्हॅक्यूम 'रिकामे' नसून ऊर्जेने भरलेले असतेअध्यात्मातील शिवतत्त्वाशी त्याचे साधर्म्य दिसते. उज्जैनचे महाकालेश्वर मंदिर हे केवळ एक प्राचीन मंदिर नसून 'काळ' या संकल्पनेचे जिवंत प्रतीक मानले जाते. प्राचीन भारतात उज्जैन हे खगोलशास्त्र, गणित आणि कालमापनाचे महत्त्वपूर्ण केंद्र होते. अनेक प्राचीन वेधशाळा, पंचांगनिर्मिती आणि ग्रह-नक्षत्रांच्या अभ्यासासाठी उज्जैनला विशेष स्थान होते. भारतीय पारंपरिक कालगणनेत उज्जैन ही एक प्रकारची 'शून्य मध्यरेषा' ( ) मानली जात होती, जिथून देशांतर मोजले जाई. कर्कवृत्तही उज्जैनजवळून जात असल्यामुळे त्याचे भौगोलिक आणि खगोलशास्त्रीय महत्त्व अधिक वाढते. त्यामुळेच येथे विराजमान असलेल्या शिवाला 'महाकाल'म्हणजे काळाचाही अधिपतीम्हणून पूजले जाते.



प्रा. कौशिक म. हरणे
नूतन महाराष्ट्र एस्टिट्यूट ऑफ
इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजी, पुणे
मो.क्र: ९६७३१७५१९७

महाकाल' ही संकल्पना केवळ कालमापनापुरती मर्यादित नाही. ती काळाच्या पलीकडील, जन्म-मृत्यूच्या चक्राच्या पलीकडील आणि परिवर्तनाच्या शाश्वत तत्त्वाची जाणीव करून देते. विज्ञान काळाला 'मोजण्याजोगा परिमाण' () मानते. आइन्स्टाइनच्या सापेक्षतावादानुसार काळ आणि अवकाश हे एकमेकांत गुंफलेले आहेतस्पेस-टाइम कंटिन्युअम म्हणून. गुरुत्वाकर्षणामुळे काळाचा वेग बदलू शकतो, ब्लॅक होलजवळ तो संथ होतो, तर विश्वाच्या विस्तारासोबत काळही प्रवाहित होत राहतो. विज्ञान काळाचे स्वरूप समजून घेण्याचा आणि त्याचे अचूक मोजमाप करण्याचा प्रयत्न करते. परंतु अध्यात्म काळाच्या पलीकडे जाण्याचा मार्ग दाखवतेजिथे 'भूत, वर्तमान आणि भविष्य' या तिन्हींचा अतिक्रमण होतो. ध्यानावस्थेत वेळेची जाणीव लोप पावते, ही अनुभूती 'महाकाल' तत्त्वाशी जोडली जाते. आधुनिक खगोलशास्त्रानुसार विश्वातील केवळ सुमारे ५% भाग दृश्य पदार्थाने ( ) बनलेला आहे. उर्वरित सुमारे २७% डार्क मॅटर आणि ६८% डार्क एनर्जीचे आहेजे प्रत्यक्ष दिसत नाही, परंतु त्याचे अस्तित्व गुरुत्वीय परिणामांमुळे आणि विश्वाच्या विस्तारामुळे सिद्ध होते. म्हणजेच विश्वाचा बहुतांश भाग अदृश्य, रहस्यमय आणि अज्ञात स्वरूपाचा आहे. अध्यात्मात या अदृश्य, सर्वव्यापी आणि निराकार तत्त्वाला 'शिव' असे संबोधले जातेजे दिसत नाही, पण सर्वत्र आहे; जे निराकार आहे, पण सर्व रूपांचे मूळ आहे. त्यामुळे महाकालेश्वर हे मंदिर केवळ श्रद्धेचे स्थान नसून काळ, अवकाश, शून्य आणि अनंत यांचा सखोल तत्त्वज्ञानात्मक विचार करण्याचे केंद्र आहे. येथे 'महाकाल' आपल्याला स्मरण करून देतात की काळाच्या अधीन असलेले सर्व काही नश्वर आहे, परंतु काळाच्या पलीकडील सत्यशिवतत्त्वशाश्वत आणि अखंड आहे.

थोडक्यात, महाशिवरात्री ही रात्र केवळ एक धार्मिक रात्र नसून ती ऊर्जा, जाणीव, शून्य, अनंत, निर्मिती आणि लय यांचे एकत्रित चिंतन आहे. विज्ञान आणि अध्यात्म हे दोन भिन्न मार्ग असले तरी दोन्हींचे अंतिम ध्येय एकाच वैश्विक सत्याचा शोध घेणे हेच आहे. महाशिवरात्री ही स्वतःच्या अंतरंगात डोकावण्याची, अज्ञानाचा अंधार दूर करून आत्मप्रकाश अनुभवण्याची आणि विश्वाशी अद्वैत साधण्याची महान संधी आहे. महाशिवरात्री हा केवळ उपवास, जागरण किंवा पूजा करण्याचा दिवस नसून तो आत्मजागृतीचा, अंतर्मुख चिंतनाचा आणि शिवतत्त्वाशी एकरूप होण्याचा पवित्र क्षण आहे. या दिवशी आपण पौराणिक कथा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अध्यात्मिक साधना यांचा संगम अनुभवतो. शिव हे शून्य, अनंत, ऊर्जा आणि जाणीव यांचे प्रतीक आहेत; त्यांच्या तत्त्वज्ञानातून आपल्याला निर्मिती, पालन आणि लय या जीवनाच्या शाश्वत चक्राची जाणीव होते. महाशिवरात्री आपल्याला अहंकार, अज्ञान आणि नकारात्मकतेचा त्याग करून शांतता, संतुलन आणि आत्मप्रकाशाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा देते. विज्ञान आणि अध्यात्म हे वेगवेगळे मार्ग असले तरी त्यांचे अंतिम ध्येय एकच आहेसत्याचा शोध. ही महान रात्र आपल्याला स्वतःच्या अंतरंगातील 'शिव' शोधण्याची आणि विश्वाशी अद्वैत अनुभवण्याची संधी प्रदान करते.

# समाजकार्याचे यशस्वी प्रयोग समाजव्यापी व्हावेत-अतुल लिमये

## जनकल्याण समितीतर्फे दादा लाड आणि महंत भारतभूषणदासजी महाराज यांना 'श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - ''समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तनाचे अनेक यशस्वी प्रयोग वैयक्तिक पातळीवर सुरू आहेत. मात्र, हे प्रयोग केवळ व्यक्तीपुरते मर्यादित न राहता समाजव्यापी होण्याची गरज आहे. तसे झाल्यास अशा प्रयोगांतूनच खऱ्या अर्थाने व्यवस्था परिवर्तन घडून येईल,'' असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांनी शनिवारी येथे केले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे आयोजित 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी प्रसिद्ध उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया मुख्य पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात संशोधन क्षेत्रासाठीचा पुरस्कार दादा लाड यांना, तर समाजप्रबोधन क्षेत्रासाठीचा पुरस्कार आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांना प्रदान करण्यात आला. शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. समितीचे अध्यक्ष डॉ. अजित मराठे यांनी प्रास्ताविक केले, तर कार्यवाह राजन गोऱ्हे यांनी स्वागत केले.

अतुल लिमये म्हणाले, ''समाजाचे शासनावरील अवलंबित्व वाढत चालले असून, यामुळे समाज अपंग बनण्याची भीती आहे. हे अवलंबित्व कमी करण्यासाठी समाज बदलवणाऱ्या

यशस्वी प्रयोगांचा अनुकरणीय आराखडा तयार करून आदर्श कार्यप्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. विकसित भारताच्या दिशेने जाण्यासाठी हे कार्य अनिवार्य आहे.''

''आजकाल अनेक लोक हिंदुत्वाबद्दल मनात कटुता बाळगून असल्याचे चित्र दिसत आहे,'' असे मत अभय फिरोदिया यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, ''भारतातील बौद्ध, जैन, शीख आणि वैदिक यांची एकत्रित परंपरा म्हणजेच हिंदुत्व होय. हिंदू धर्म ही एक जीवनपद्धती आणि विचारधारा असून, तिला प्रत्यक्ष कृतीत आणण्याची प्रक्रिया म्हणजे हिंदुत्व होय. जनकल्याण समिती समाजाच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या लोकांना संघटित आणि कार्यान्वित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत आहे.'' ''मूल्यांची समज म्हणजेच धर्म होय. जोपर्यंत आजची पिढी नैतिक मूल्यांची कास धरून चालेल, तोपर्यंत धर्म अबाधित राहील,'' असेही फिरोदिया यांनी नमूद केले.

भारतभूषण महाराज म्हणाले, ''सनातन परंपरा आपल्याला जीवन जगण्याची कला शिकवते. समाजाला वैभवशाली बनविण्यासाठी व्यावहारिक कार्याबरोबरच आत्मिक शांतीसाठीही प्रयत्न करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मूल्यमापन बाहेर राहून करता येणार नाही, त्यासाठी संघात प्रत्यक्ष सहभागी व्हावे लागेल.

दादा लाड यांनी कापूस हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे नव्हे, तर वैभवाचे पीक असल्याचे मत व्यक्त केले. ते म्हणाले, ''विदर्भातील आत्महत्यांना दुर्दैवाने कापूस पिकाशी जोडले गेले. वास्तव पाहता, संपूर्ण जगाला कापडाची देणगी देणाऱ्या भारताचे कापूस हे मुख्य नगदी पीक आहे. कापसाचे उत्पन्न वाढवायचे असेल, तर बोंडाचे वजन वाढणे गरजेचे आहे. मी कापूस पिकाची गळफांदी काढून फळफांदी लांबवण्याचे तंत्र विकसित केले. यामुळे कापसाच्या एका बोंडाचे वजन १० ग्रॅमपर्यंत वाढले आणि पर्यायाने एकरी उत्पन्न ४ ते ५ क्विंटलवरून थेट १५ क्विंटलपर्यंत पोहोचले.''

चिंचवडच्या पूर्वांचल छात्रावासमधील विद्यार्थ्यांनी संपूर्ण वंदे मातरम सादर केले. सेवा भारती संस्थेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे सचिव प्रदीप सबनीस यांनी आभार प्रदर्शन आणि प्रा. डॉ. प्रांजली देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले.

### एक कोटींची देणगी

जनकल्याणाच्या कामाला प्रोत्साहन देणे मदत करणे, असे महत्त्वपूर्ण काम जनकल्याण समिती करत आहे. समाजाच्या उत्कर्षाचे हे फार मोठे साधन आहे, अशा शब्दात जनकल्याण समितीच्या कार्याचा गौरव डॉ. अभय फिरोदिया यांनी केला आणी या कार्यासाठी एक कोटी रुपयांची देणगी देत असल्याचे जाहीर केले.

# सहज सुचलं म्हणून...

**ज्योतिर्मय साहित्य**

''भूत-भविष्य चिंतनात नाही तर वर्तमान कळतं''

भूत म्हणजे स्मृतींची सावली.

भविष्य म्हणजे कल्पनांची छाया.

दोन्हींचा आधार मन आहे आणि मनच काळ निर्माण करते.

पण वर्तमान?

तो ना स्मृती आहे, ना कल्पना. तो शुद्ध अनुभूती आहे.

उपनिषद म्हणतात ''यत् साक्षादपरोक्षाद् ब्रह्म''

जे प्रत्यक्ष आहे, तेच ब्रह्म आहे.

वर्तमान क्षण हाच साक्षात् ब्रह्मानुभवाचा दरवाजा आहे.

जो क्षण पूर्णतेने जगतो, तो काळाच्या पलीकडे जातो.

''दिवसांचे महत्त्व कमी झाले की 'क्षणांचे' मूल्य कळते''

दिवस हे मोजमाप आहे. क्षण हा अनुभूती आहे.

दिवस बाह्य घड्याळ सांगते. मात्र क्षण अंतःकरण उलगडते. जेव्हा आपण दिवसांच्या धावपळीतून थांबतो, तेव्हा जाणवते जीवन दिवसांनी नव्हे, तर जागृत क्षणांनी घडते.





अपर्णा परांजपे,
पुणे मो. 95030 45495

अद्वैत दृष्टीने प्रत्येक क्षणात पूर्णत्व आहे.

कारण क्षणातच चैतन्य प्रकट आहे.

''भगवंत हृदयस्थ आहे'' भगवंत शोधायचा बाहेर का?

तो तर साक्षीभावात, शुद्ध जागरूकतेतच आहे.

''ईशावास्यमिदं सर्वम्''

सर्व काही त्याने व्यापले आहे;

मग हृदय त्याच्या बाहेर कसे असेल?

जेव्हा मन भूत-भविष्य सोडते,

तेव्हा हृदयात शांत, निर्विकल्प प्रकाश उगवतो.

तोच भगवंत.

थोडक्यात

न भूतं न भविष्यं, केवलं वर्तमानम्।

न कालः तत्र भाति, केवलं चैतन्यम्।

यस्मिन् क्षणे विश्रान्तिः, स एव ब्रह्मक्षणः।।

(भूत नाही, भविष्य नाही जे उरते ते वर्तमान चैतन्य;

ज्या क्षणी विश्रांती मिळते, तोच ब्रह्मक्षण.)

ध्यान म्हणजे अपूर्णतेच गोडी वाटणे, अनुभवणे

भूत-भविष्य निवळले की क्षण पवित्र होतो; क्षण पवित्र झाला की हृदय मंदिर बनते.

भगवंत हृदयस्थ आहे.

# संध्यामग्न नेत्राच्या पापणकडा....

**ज्योतिर्मय साहित्य**



तटस्थ संध्याकाळ. जी स्वतःत उत्साहित नाही. स्वतःत उदास अशी ही नाही. ही संध्या स्वतःच्या तत्वाशी प्रामाणिक आहे. ती भावनेच्या आहारी जात नाही. ती सर्वांसाठी सारखी, समान आहे. आभाळासारखी. आभाळ भेदभाव करत नाही. संध्येकडे ही कोणासाठी फरक नसतो.

या तटस्थ संध्यासमयी
आभाळ कुणाचे नसते
डोळ्यात साठले
ज्याच्या
डोक्यावर माया दिसते

संध्याकाळ तटस्थ आहे पण एकटी नाही. निसर्गाच्या प्रत्येक जीवंत कणा-कणातून दिवसभराच्या जीवनक्रमाच्या अनुभवातून निघालेले शापित हुंकार अजीव बनून पृथ्वी होत असताना आभाळाकडे चाललेले शेवटचे श्वास, डोळ्यांच्या खोल गर्तेत अखेरच्या पेशीतल्या केंद्रकाला स्पर्शून परतलेले आश्वस्त अणु रेणु पापण्यांच्या काठावर ओले चित्कार सोडून आकाशस्थ होतात. अशाच सांजवेळी मन नेत्रांना आश्वस्त करत असतं.

आश्वस्त सांज होताना
हुंकार कुणाचे आले
आभाळ धरेला मिळता
नेत्रांचे काजळ ओले

बलराज संघई
छत्रपती संभाजीनगर मो. 9420015108

सृष्टीचे सृजन करतानाच धरती एक दान पदरात टाकत असते अन् निसर्गाच्या कणाकणाला, आश्वस्त समज येते. तटस्थ उभ्या असलेल्या झाडांचा पानापानांच्या पेशींच्या हृदयातून निघालेल्या आर्त स्वराच्या लहरीनीं व्यापलेली संध्याकाळ निरपेक्ष शांत भासते. अनपेक्षित आलेल्या हवेच्या झुळुकेला ही पानं, साऱ्या अपेक्षा परत मनाच्या हवाली करून स्वतःत स्वतःच्या पाकळ्यांना मिटवत सांजेला गंधाचा अर्घ्य समर्पित करणारी फुलं निरागी, निर्लोभी स्तब्धतेने संध्यामग्न झालेली दिसतात

पाकळ्या मिटून घेताना
श्वास अंतरी घ्यावा
सांजेच्या ओंजळीमध्ये
अर्घ्य समर्पित व्हावा

तुझ्यात मी असलेल्या अपेक्षेने माझा निसर्ग निरपेक्ष नसतो. म्हणूनच तुझ्या नेत्रात सापेक्ष डोकावणारा मी आश्वस्त असतो. अपेक्षेचे हुंकार सोडून स्तब्ध झालेल्या निसर्गाला कवेत घेताना संध्येने माझा विचार केला असेल असे उगीचच वाटते. तीच व्यापक संध्या तुझ्या ही नेत्रात सामावली असेल कां? माझ्यातलं तुझं असणं, तुझ्यात मी असणं या दोन्ही माझ्याच मनाच्या अस्वस्थ अवस्था.

माझ्यात तुझे ते असणे
ही भूल मनाला घ्यावी
आश्वस्त नेत्रामधली
समज कुणाला यावी

संध्येच्या निरव शांततेच्या व्यापकतेचा अनुभव घेताना तुझ्या नेत्रातील आश्वस्ततेच्या साक्षीच्या शोधात निघालेली माझी पावलं ही नेत्र झालेली असतात. त्या नेत्रांच्या पापणकडांच्या ओलाव्याने भिजलेली पावलं तुझ्या रस्त्यावर माझ्या अस्तित्वाची साक्ष सोडतात. पहाटे रस्त्यावर तुझी पावलं तुला माझ्या पाऊल खुणांच्या साक्षीने स्तब्ध करतील. त्यावेळी तुझ्या माझ्या पावलांना परस्पर संध्यामग्न ओल्या नेत्रांच्या पापणकडांची साक्ष येईल.

# भोर येथील निवासी मूक बधिर विद्यालयाचे स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे-** भोर येथील निवासी मूक बधिर विद्यालय व पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालय यांचे ''संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन '' दिनांक १२ फेब्रुवारी व १३ फेब्रुवारी रोजी संपन्न झाले. स्नेहसंमेलनाच्या पहिल्या दिवशी विविध गुणदर्शन समारंभ संपन्न झाला.या कार्यक्रमात निवासी मूकबधिर विद्यालय,आणि भो. ए. सो. पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन २४ कार्यक्रम सादर केले .

शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी रोजी ''वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ'' संपन्न झाला .

सकाळी ११-३० ते १-०० या वेळेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना स्नेहभोजन देण्यात आले. त्यानंतर दुपारी ३-३० वाजता वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी उद्घाटक म्हणून पुण्यातील औद्योगिक औषधीशास्त्र सल्लागार मोहन मोने, उद्योजक व गुंतवणूक सल्लागार मंदार ओक, राष्ट्रीय बुद्धिबळ खेळाडू प्रकाश देशपांडे हे होते.कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी दत्तात्रय मोरे (सदस्य -ग. कौ.भो.ए.सो.) हे होते.

प्रमोद गुजर (चेअरमन- ग. कौ.भो.ए.सो.) डॉ.सुरेश गोरेगांवकर (मा.सचिव भो.ए.सो.)

मधुकर पैठणकर (उपाध्यक्ष - भो.ए.सो.)महादेव मळेकर(उपाध्यक्ष- भो.ए.सो.)

डॉ.आण्णासाहेब बिराजदार (चेअरमन -स्कूल कमिटी निवासी मूकबधिर विद्यालय आणि भो.ए.सो.पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा,भोर) ह्यांची मुख्य उपस्थिती होती.

विविध गुणदर्शन कार्यक्रमातील निवडक चार कार्यक्रम सादर करण्यात आले. मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी ''छावा'' पूर्व प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी ''टप टप पडती ''..., प्राथमिक शाळेतील इयत्ता ३री च्या २४ विद्यार्थिनींनी '' ''अष्टविनायक गणपतीचे गाणे'' हा सुंदर नृत्याविष्कार सादर केले. इयत्ता २री, ३री ४थी च्या ७६ विद्यार्थ्यांनी २०२५ मध्ये आपल्या देशात घडलेल्या महत्त्वाच्या घडामोडी -''महाकुंभमेळा, श्रीराम मंदिरावरील ध्वज प्रतिष्ठापना, जागतिक वारसा मिळालेले महाराष्ट्रातील किल्ले, महिला वर्ल्ड कप आणि सिंदूर ऑपरेशन'' असा एकत्रित कलाविष्कार भारत २०२५ सादर केला.सुरवातीस प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले.

भो.ए.सो.पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळेच्या प्र. मुख्याध्यापिका विनया कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले.मूकबधिर विद्यार्थी आणि प्राथमिक शाळेतील विद्यार्थी यांचे हे वैशिष्टयपूर्ण असे संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन,वर्षभरात शाळेत घेतले जाणारे शालेय,सहशालेय व शाळाबाह्य उपक्रम, विविध स्पर्धा परीक्षा याची तसेच विद्यार्थ्यांची गुणवत्ता याबाबत माहिती दिली.

भो.ए.सो.प्राथमिक शाळेच्या कार्याध्यक्षा ज्योती वाघमारे यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांना शाल, श्रीफळ व गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रमुख पाहुणे मोहन मोने यांनी आपल्या मनोगतामध्ये मराठी शाळांचे महत्त्व विशद केले. मंदार ओक यांनी विद्यार्थ्यांना विविध स्पर्धेत सहभागी होऊन आपल्या कलागुणांचा विकास करावा असे आवाहन केले.प्रकाश देशपांडे सर यांनी मुलांना बहुमूल्य असे मार्गदर्शन केले.

मंदार ओक यांनी शाळेसाठी रुपये पंचवीस हजार रुपयाची देणगी दिली.

प्रमुख पाहुणे व सन्माननीय पदाधिकारी यांच्या हस्ते वर्षभरात झालेल्या विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. निवासी मूकबधिर विद्यालय,चे कार्याध्यक्ष महादेव दबडे यांनी आभार मानले.

अशाप्रकारे शरद जाधव (प्र.मुख्या. निवासी मूकबधिर विद्यालय, भोर) विनया कुलकर्णी (प्र.मुख्या.भो.ए. सो. पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा,भोर) यांच्या मार्गदर्शनानुसार संयुक्त वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय नियोजनबद्ध रीतीने व उत्साहात पार पडले.

# माता-पिता पूजन सोहळा जिल्हा परिषद शाळेत उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

धारूर (सौ.जयश्री मुंडे) :तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेत माता-पिता पूजन सोहळा मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये पालकांविषयी आदर, कृतज्ञता आणि संस्कारांची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेच्या मुख्याध्यापक श्री. नारायण रुद्रे सर यांनी उपस्थितांचे स्वागत करून माता-पित्यांचे जीवनातील स्थान स्पष्ट केले. ''आई-वडील हेच मुलांचे पहिले गुरू असून त्यांच्या त्याग, प्रेम आणि कष्टांमुळेच मुलांचे व्यक्तिमत्त्व घडते,'' असे त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे औक्षण करून, त्यांच्या चरणी वंदन केले. विद्यार्थ्यांनी पालकांना पुष्प अर्पण करून कृतज्ञता व्यक्त केली. या प्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या

आई-वडिलांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या. वातावरण अतिशय भावनिक व संस्कारमय झाले होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी ''माता-पित्यांचा मान राखू या'', ''संस्कार हीच खरी संपत्ती'' यांसारख्या विषयांवर भाषणे, कविता आणि गीतांचे सादरीकरण केले. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत शाळेने दिलेल्या संस्कारप्रधान शिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना आयुष्यात यशस्वी होण्यासाठी पालकांचा सन्मान, आज्ञाधारकपणा आणि कृतज्ञता या मूल्यांचे महत्त्व समजावून सांगितले.

या आनंद सोहळ्यात अनेक माता पालकांच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहत होते. वातावरण भावनिक आणि मंत्रमुग्ध बनले होते.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पालकांविषयी आदरभाव वाढीस लागून शाळेत एक संस्कारमय वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अर्जुन मुंडे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री.रामेश्वर मुंडे सर यांनी मानले. श्री. शेषनारायण घोळवे सर यांचे देखील सहकार्य लाभले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जाणिवांच्या ज्योती
कृतज्ञतेने लावुया
आई बाबा हे महात्मा
कृतीतून दाखवू या
देवाचेच दोन्ही रूप
लाभले ते भाग्यवंत
नसेल ह्यांचे छत्र ज्यास
कसा होई कीर्तिवंत

# जेष्ठ नागरिकांतर्फे धम्माल नाट्य दर्शन

**ज्योतिर्मय साहित्य**

छ. संभाजीनगर (प्रतिनिधी) प्रगतिशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थे तर्फे कार्यकारिणी सदस्यांचा विविध गुण दर्शन कार्यक्रम गुरुवार १२-०२-२०२६ रोजी वि. वि. चिपळूणकर सभागृह, गीता भवन येथे संपन्न झाला. प्रमुख पाहुणे श्री. भाऊ सुरडकर, अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर प्रेमी मित्र मंडळ, छ. संभाजीनगर होते. संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत पत्की, सचिव प्रेमचंद तुल्ले, उपाध्यक्ष शैलजा देशपांडे, श्री. सुधीर सेवेकर - भुतान येथे होणाऱ्या सावरकर संमेलनाचे अध्यक्ष, प्रा. स्नेहल पाठक - प्रदेशाध्यक्ष संस्कार भारती देवगिरी प्रांत यांची प्रमुख उपस्थिती होती. भुतान येथे सप्टेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या सावरकर संमेलनाच्या निमंत्रण पत्रिकेचे विमोचन श्रीकांत पत्की यांचे हस्ते करण्यात आले.

सूत्र संचालन प्रमोद बेंडे यांनी केले तर निवेदन प्रा. शैलजा देशपांडे यांनी केले. श्रीकांत पत्की यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अशोक पाध्ये यांनी ध्वनि व्यवस्था, इशिता कापसे हिने रंगभूषा तर आदित्य काळे (एमजीएम) याने दृकश्राव्य व संगीत बाजू सांभाळली.

भाऊ सुरडकर यांचा परिचय शैलजा देशपांडे यांनी केला, स्वागत शाल व पुष्पगुच्छ देऊन श्रीकांत पत्की यांनी केले. तसेच श्री. सुधीर सेवेकर आणि प्रा. स्नेहल पाठक यांचा ही यथोचित सत्कार करण्यात आला.

यावेळी खालील सादरीकरण करण्यात आले.

१. गणेशवंदना विश्वास काळे व दिनेश जोशी

२. कौन्तेय नाट्य प्रवेश कलाकार प्रमोद सुरडकर कर्ण विनिता कलबुर्गे कुंती इंदू अरोरा दासी देवेंद्र श्रीवास्तव द्वारपाल

३. विश्वास काळे पिंजरा चित्रपटातील ''ग साजणी लावणी ''

४. देवेंद्र श्रीवास्तव - सारंगा तेरी याद मे हिन्दी गीत

५. विनायक दामोदर सावरकरांची शौर्यगाथा नाटिका

कलाकार श्रीकांत पत्की सावरकर , दिनेश जोशी लोकमान्य टिळक, कमलाकर पाठक मदनलाल धिंगरा , दत्तात्रय कुलकर्णी अनंत कान्हेरे देवेंद्र श्रीवास्तव निरंजन पाल , प्रमोद बेंडे जेलर बारी लेखन,दिग्दर्शन व निवेदन शैलजा देशपांडे यांनी केले.

६. प्रेमचंद तुल्ले - वीरांगणा प्रीतिलता वाडीदार यांचे चरित्र सांगितले.

७. दिनेश जोशी गीत '' या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे '' .

८. सुर्यकांत कुलकर्णी कविता सादर केली.

९. प्रमोद बेंडे - हिन्दी गीत ''बेकरार करके हमे यू न जाइये अपाको हमरी कसम लौट आइये''

१०. सामूहिक झुंबा नृत्य कोरिओग्राफी पल्लवी रवींद्र धामणगावकर यांनी केली.

**मान्यवरांच्या प्रतिक्रिया:**

**भाऊ सुरडकर**

'' कौंत्येय '' नाटीकेत प्रमोद सुरडकर यांनी कर्ण पात्र अतिशय हुबेहूब सादर केलं, सुंदर वेशभूषा व पाठांतर. विश्वास काळे यांच्या पिंजऱ्याच्या गाण्यावर सर्वांनी ठेका धरला होता, अतिशय सुंदर सादरीकरण.

''विनायक सावरकरांची शौर्य गाथा'' हे पहिलं असं नाटक असेल की जे रंगभूमीवर आपल्या माध्यमातून सादरीकरण झालं. श्रीकांत पत्की यांनी जी सावरकरांची भूमिका केली त्यांना साजेशी अशी ती भूमिका होती. मला तर सावरकर चित्रपटात ज्यांनी सावरकरांची भूमिका केली असे शैलेंद्र गौड यांची आठवण झाली.

विदेशी कपड्यांच्या होळीचे दृश्य लाईट इफेक्ट मुळे आकर्षक वाटले. पुणे येथे ज्या ठिकाणी विदेशी कपड्यांची होळी सावरकरांनी केली होती त्याच ठिकाणी आज भव्य सावरकरांचे स्मारक झालेल आहे. मदनलाल धिंगरा याने कर्झन वायली ची गोळ्या झाडून केलेली हत्या, व अनंत कान्हेरे यांनी केलेला जॅक्सनचा वध, दोन्ही दृश्ये बंदुकीच्या गोळीच्या साऊंड इफेक्ट मुळे खरे वाटले.

लंडन मधील लायटन येथे समुद्र किनारी सावरकर व निरंजन पाल यांची भेट, समुद्राच्या लाटांचा इफ ेक्ट, सावरकरांनी गायलेलं '' ने मजसी ने, परत मातृभूमीला '' हे गाणं ऐकून आदरणीय सुधीर फडके यांनी ब्रायटन किनाऱ्यावर गायलेलं गाणं, तो धीर गंभीर आवाज आजही मनाला स्पर्श करून गेला. सावरकरांची ती जग प्रसिद्ध समुद्र उडी, अंदमानच्या काळ कोठडी मध्ये सावरकरांच्या काळ्यापाण्याची शिक्षा हा प्रसंग आपण दाखवला, तात्यारावांनी जी शिक्षा भोगली त्याबद्दल तर आपण विचारही करू शकत नाही. अशी ती काळ्यापाण्याची शिक्षा आपण दाखविली. प्रमोद बेंडे यांचा जेलर बारी चा अभिनय पाहून चित्रपटात जेलरची भूमिका केलेले डेव्हिड कॅड व मधुसुदन ताम्हणे यांची आठवण झाली.

आपण सर्व कलाकाराने अतिशय सुंदर सादरीकरण केलं, त्या माध्यमातून या सगळ्या जुन्या गोष्टींना उजाळा मिळालेला आहे. विशेष कौतुक म्हणजे शैलजा देशपांडे त्यांनी ही नाटकाची संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आणली आणि आपल्या सर्वांच्या माध्यमातून परिपूर्ण करुन घेतली. त्याबद्दल त्यांच्यासह आपले देखील खूप खूप अभिनंदन.

**प्रा. स्नेहल पाठक -**

प्रगतीशील जेष्ठ नागरिक सेवाभावी संस्था आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमाचा आस्वाद घेताना मनोमन आनंद झाला. उत्तम गीत सादरीकरण...कौंतेय नाटकातील प्रत्येक पात्र बोलके होते कर्णाची भुमिका साकारणे तसे कठीण आहे पण प्रमोद सुरडकर यांनी हुबेहुब उभे केले

सावरकर यांचा जीवन पट अतिशय भावस्पर्शी वाटला सावरकरांची भुमिका करणारे श्रीकांत पत्की खुप एकरुप झाले होते. दिसणं ..असणं ..त्यांचा रंगमंचावरील वावर सहज होता. कृत्रिम नव्हता. दिनेश जोशी यांचा लोकमान्य टिळक, कमलाकर पाठक चा मदनलाल धिंग्रा, दत्तात्रय कुलकर्णी चा अनंत कान्हेरे , प्रमोद बेंडे चा जेलर बारी .. ही पात्र सुध्दा उल्लेखनीय होती. विदेशी कपड्याची होळी लाईट इफेक्ट मुळे लक्षवेधी ठरली. अधिनियम तंत्रज्ञानाचा वापर हे कौतुकास्पद आहे .हे नाटक रसिकांच्या मनात घर करुन गेले. आपण सर्वांनीच रसिकांना खिळवून ठेवले. सर्वांचे मनापासून अभिनंदन.

हा कार्यक्रम पाहताना ज्येष्ठांचा नसून तरुणांचा वाटला. शैलजा देशपांडे यांचे खास अभिनंदन..अतिशय दमदार वाटचाल सुरु आहे.. दिमाखदार सोहळा अविस्मरणीय ठरला .एवढेच या निमित्ताने.

प्रा. स्नेहल पाठक
प्रदेशाध्यक्ष..संस्कार भारती, देवगिरी प्रांत.

**भरत कुलकर्णी**

आजचा विविध गुण दर्शन कार्यक्रम अतिशय सुंदर झाला. दिनेश जोशी, विश्वास काळे, श्रीवास्तव, प्रमोद बेंडे यांची गाणी सुमधुर झाली. महारथी अंगराज उभा करण्यात प्रमोद सुरडकर यशस्वी झाले. देवेन्द्रजी यांनी द्वारपाल उत्तम उभा केला त्यांना इंदु व विनिता यांनी उत्तम साथ दिली. सावरकर नाटक उत्तम झाले. निवेदन सुरेख, कास्टिंग खूप छान, वेशभूषा बेस्ट, संगीत योग्य वापर, कमलाकर पाठक, दत्ता कुलकर्णी, दिनेश जोशी यांनी आपापली कामे खुप छान केली. श्रीकांत पत्की यांनी भूमिकेला योग्य न्याय दिला. धीरगंभीर सावरकर रसिकांना आवडले. प्रेमचंद तुल्ले यांनी वीरांगना प्रीतीलता वाडेदार चांगली उभी केली. एकच कविता सादर करून सूर्यकांत कुलकर्णी भाव मारून गेले. झुंबा डान्स वन्स मोर झाला यातच सगळे आले. थोडक्यात सांगायचे तर कमी वेळात उत्तम लेखक, उत्तम रंगकर्मी, गायक, वादक यांची निर्मिती करणारी संस्था म्हणून गीताभवन प्रसिद्ध होत आहे हे नक्की. अर्थात अशोक पाध्ये यांच्या साउंड मदती शिवाय कुठलाही कार्यक्रम होऊ शकत नाही. सर्वांचे खूप खूप अभिनंदन, शैलाताई यांचे लेखन निवेदन भारी व तसेच भारी निवेदन बेंडे यांनी करून जेलर बारी खूपच भारी व आठवणीत राहील असा केला.

# संदीप खरे प्रेमकवी पुरस्काराने सन्मानित

## रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे पुण्यात गौरव; कवितांवर केले भाष्य

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे - प्रसिद्ध कवी आणि गीतकार संदीप खरे यांना रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे प्रेमकवी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. व्हॅलेंटाईन डेनिमित्त आयोजित या कार्यक्रमात त्यांनी आपल्या आयुष्याच्या वाटचालीतील प्रेमाच्या विविध रूपांवर आणि त्या कवितांमधून कशा मांडल्या यावर भाष्य केले. पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना संदीप खरे म्हणाले की, प्रेम कविता लिहिण्यासाठी वयाचे बंधन नसते. आयुष्याच्या प्रवासात प्रेमाची अनेक रूपे दिसली आणि ती मी कवितांमधून व्यक्त करत गेलो. अनेक प्रवाह माझ्या कवितेत मिसळत गेले. त्यांनी यावेळी मन तळ्यात मळ्यात जाईच्या मळ्यात आणि आपण काय करणार या त्यांच्या स्वरचित कविता सादर करून रसिकांना प्रेम दिनाच्या अनोख्या शुभेच्छा दिल्या.

या पुरस्काराचे वितरण ज्येष्ठ कवयित्री हेमा लेले यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी प्रसिद्ध कवी आणि व्याख्याते डॉ. आशुतोष जावडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. रंगत-संगत प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. प्रमोद आडकर आणि मैथिली आडकर हे देखील मंचावर उपस्थित होते.

डॉ. आशुतोष जावडेकर यांनी संदीप खरे यांच्या कवितांची समीक्षात्मक चिकित्सा व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. ते म्हणाले की, कवितेला एक सशक्त परंपरा आहे आणि कवितेचे धागे संतसाहित्यातही दिसतात. लयबद्धता आणि नादब्रह्मता हे संदीप खरे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी मराठी भाषेपासून दूर गेलेल्या युवा पिढीला काव्याच्या माध्यमातून मराठी भाषेची गोडी लावली असून भाषेविषयीची मरगळ दूर केली आहे.

कवयित्री हेमा लेले म्हणाल्या की, कविता केवळ कागदावर उमटून चालत नाही, तर ती खऱ्या अर्थाने जगायची असते. साहित्यातील सर्वोच्च गोष्ट म्हणजे कविता होय. आयुष्य जगत असताना तन-मनाने आयुष्याचा धागा विणत गेल्यास आयुष्याकडे बघण्याचा एक नवा दृष्टिकोन मिळतो. कार्यक्रमाचे प्रास्ताविकपर स्वागत ॲड. प्रमोद आडकर यांनी केले, तर सन्मानपत्राचे वाचन आणि सूत्रसंचालन शिल्पा देशपांडे यांनी केले. या पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त प्रेम या विषयावर कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात शिवप्रिया सुर्वे, डॉ. ज्योती रहाळकर, निरुपमा महाजन, स्वप्नील पोरे, तनुजा चव्हाण, प्रभा सोनवणे, मृणालिनी कानिटकर-जोशी, वि. दा. पिंगळे, विजय सातपुते, वैजयंती आपटे आणि सुजित कदम या कवींचा सहभाग होता. या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन प्राजक्ता वेदपाठक यांनी केले.

# मातृपितृ पूजन दिवस अतिशय मंगलमय व पवित्र वातावरणात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**

सावंगी - संस्कृती ग्लोबल स्कूल व ज्युनिअर कॉलेज, सावंगी येथे मातृपितृ पूजन दिवस अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि संस्कारमय वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाला होता.

हा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी दिलीपजी स्वामी यांच्या दशसूत्री उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी अश्विनी ताई लाठकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच या कार्यक्रमासाठी डॉ. सुनील आदिक तथा मनीषा ताई आदिक यांचीही

उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात वैदिक मंत्रोच्चारणाने झाली. त्यानंतर शाळेचे संस्थापक तथा प्राचार्य प्रा. बाबासाहेब मोराळकर यांनी प्रास्ताविकात मातृपितृ पूजनाची परंपरा, भारतीय संस्कृतीतील कुटुंबसंस्थेचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या जीवनातील आई-वडिलांचे स्थान यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमात सुमारे ६०० विद्यार्थ्यांचे पालक, आई-वडील तसेच आजी-आजोबा मोठ्या संख्येने सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांचे औक्षण करून, पुष्पहार अर्पण करून व वंदन करून कृतज्ञता व्यक्त केली.

मार्गदर्शन करताना दिलीपजी स्वामी यांनी आई-वडिलांचा सन्मान हीच खरी संस्कृती असल्याचे अधोरेखित केले. ''आपल्यावर खऱ्या अर्थाने प्रेम करणारे या जगात जर कोणी असेल, तर ते आपले आई-वडील आणि आजी-आजोबा आहेत,'' असे त्यांनी सांगितले. तसेच अनेक वृद्धाश्रमांमध्ये शंभर जणांची क्षमता असतानाही चारशे-चारशे जण वास्तव्यास असल्याची परिस्थिती अत्यंत चिंतेची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

या वेळी जिल्हाधिकारी दिलीपजी स्वामी यांनी गुरुकुल विद्यार्थी सदन वसतिगृहास भेट देऊन तेथील सुविधा, स्वच्छता व शिस्त यांची पाहणी केली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांना मार्गदर्शन केले.

संपूर्ण कार्यक्रम भक्तिमय व मंगलमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन वरदवाघलवाळे आणि अंकिता कुबेर यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रणवीर बहुरे यांनी केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये पालकांविषयी आदर, कृतज्ञता आणि सामाजिक जाणीव दृढ करणारा ठरला.

# विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये ''बुक बँक'' उपक्रम, स्पर्धा परीक्षांचे बाळकडू देणार

**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर - जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या ''दशसूत्री'' उपक्रमांतर्गत वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी बुक बँक संकल्पना राबविण्याचा निर्णय जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला असून त्याची अंमल बजावणी करण्याचे आदेश शिक्षण विभागाला देण्यात आले आहेत.

यासंदर्भात आज दूरदृष्य प्रणाली द्वारे बैठक आयोजित करून जिल्हाधिकारी स्वामी यांनी शिक्षण विभागाला निर्देश दिले.

शिक्षणाधिकारी (माध्य)अश्विनी लाठकर, शिक्षणाधिकारी (प्राथ) जयश्री चव्हाण, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, विषयतज्ञ असे एकूण १६२ जण या बैठकीस उपस्थित होते.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे, अवांतर वाचनाद्वारे अभ्यासक्रमाबाहेरील ज्ञान वाढविणे तसेच गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त पुस्तके उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

जिल्हा परिषदेच्या प्रत्येक शाळेत लहान ग्रंथालय उभारून विविध विषयांवरील पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत, असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

**उपक्रमाची उद्दिष्टे**

मुलांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून ''वाचाल तर वाचाल'' या संकल्पनेला बळकटी देणे.

गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी पुस्तके उपलब्ध करून देणे.

विद्यार्थ्यांबरोबर शिक्षकांमध्येही वाचन संस्कृती वाढविणे.

**अशी होईल अंमलबजावणी**

प्रत्येक शाळेत स्वतंत्र पुस्तक कपाट किंवा रॅकची व्यवस्था करून विद्यार्थ्यांच्या वयोगटानुसार पुस्तके ठेवली जाणार आहेत. अभ्यासक्रमाबाहेरील ज्ञानवर्धक, संस्कारवर्धक, आरोग्यविषयक व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त साहित्याची यादी तयार केली जाईल. जिल्हा परिषद शिक्षण विभाग, शासकीय ग्रंथालये, मराठी भाषा विभाग तसेच विविध संस्थांकडून पुस्तके उपलब्ध करून घेण्यात येतील.

स्थानिक शिक्षण समित्या, माजी विद्यार्थी, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संस्था, तसेच लायन्स क्लब व रोटरी क्लब यांच्या सहकार्याने पुस्तक संकलन मोहीम राबविण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर निधीतूनही पुस्तके उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न करण्यात येतील.

**मुख्याध्यापक करतील व्यवस्थापन**

बुक बँकेचे व्यवस्थापन मुख्याध्यापकांच्या देखरेखीखाली राहील. शिक्षक विद्यार्थ्यांना पुस्तक वापर मार्गदर्शन करतील. तालुका व जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी उपक्रमाची अंमलबजावणी व तपासणी करतील.

**अंमलबजावणीची कार्यपद्धती**

विद्यार्थ्यांना पुस्तके ठरावीक कालावधीसाठी देण्यात येतील व परत घेतली जातील. परत आलेली पुस्तके नीट नेटके व स्वच्छ करून पुढील वर्षासाठी वापरात ठेवली जातील. पुस्तक नोंदणीसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल. विद्यार्थ्यांनी वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा, सादरीकरण, वाचन उपक्रम व परिपाठातून अनुभव मांडण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

माध्यमातून उपलब्ध शिष्यवृत्ती परीक्षांसाठीच्या पुस्तकांचे वितरण १० फेब्रुवारी रोजी करून या उपक्रमाची सुरुवात झाली आहे,असेही जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

**पुस्तके दान करण्याचे आवाहन**

या उपक्रमाला चालना देण्यासाठी समाजातील व्यक्ती, संस्था आपले योगदान देऊ शकतात. आपल्याकडील पुस्तके(विद्यार्थ्यांना उपयोगी ठरतील असे) आपण दान करू शकता. त्यासाठीसंबंधित गट शिक्षणाधिकारी, तहसीलदार यांना संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी स्वामी यांनी केले आहे.